दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक ६५ वा | रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


### मढीत चक्क देवच चोरीला

**पाथर्डी :** तालुक्यातील मढी येथील प्रसिद्ध कानिफनाथ गडासमोरील दुकानातून पितळ धातूची श्री दत्ताची मूर्ती व कमंडलू चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली असून, ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. विशेष म्हणजे, या फुटेजमध्ये एका मुलीकडूनच चोरी केल्याचे स्पष्ट दिसत असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी समाधान अंकुश मरकड (वय ३४, व्यवसाय दुकानदार, रा. मढी) यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. मरकड यांचे कानिफनाथ मंदिरासमोर समाधान पूजा सेंटर व प्रसादालय हे दुकान असून ते कुटुंबासह व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. फिर्यादीनुसार, त्यांनी दुकान वडिलांच्या ताब्यात देऊन बाहेर गेल्यानंतर अज्ञात व्यक्तींनी दुकानातून चोरी केली आहे.

**आजचे हवामान**

कमाल 37°C | किमान 24°C

पेट्रोल 103.50 | डिझेल 90.03

सोने 1,54,605 | चांदी 2,58,079

# राष्ट्रहित हेच सर्वोच्च

## ◆ पंतप्रधान नरेंद्र मोदी; लाईव्ह येत देशाशी साधला संवाद ◆ स्वार्थी राजकारणामुळे महिलांचे नुकसान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** माझ्यासाठी राष्ट्रहित हेच सर्वोच्च आहे; तरीही, जेव्हा काही व्यक्तींसाठी पक्षहित हेच सर्वस्व बनते, जेव्हा पक्षहित हे राष्ट्रहितापेक्षा अधिक महत्त्वाचे ठरते तेव्हा त्याचे परिणाम शेवटी नारी शक्तीलाच भोगावे लागतात, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल, शनिवारी सायंकाळी ८:३० वाजता महिला आरक्षणाच्या विषयावर देशाला संबोधित करतांना ते बोलत होते.

### काँग्रेस परजीवीप्रमाणे, इतर पक्षांवर अवलंबून

अनेक राज्यांमध्ये काँग्रेसने आपले अस्तित्वच गमावले आहे. इतर पक्षांच्या आधारावर अवलंबून राहून, ती एका परजीवीप्रमाणे तग धरून आहे. शिवाय, प्रादेशिक पक्षांची ताकद वाढलेली पाहण्याची त्यांची इच्छाही नाही. हे विधेयक रोखून धरून, त्यांनी एक राजकीय कट रचला आहे. अनेक वर्षांपासून, संपूर्ण विरोधी पक्ष सातत्याने तीच तीच कारणे पुन्हा पुन्हा पुढे करत आला आहे. काही ना काही तांत्रिक अडचण निर्माण करून, ते प्रभावीपणे महिलांना त्यांच्या अधिकारांपासून वंचित ठेवतात, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

लोकसभेत बहुमताचा आकडा न गाठता आल्याने गेल्या मोदी सरकारने आणलेले नारी शक्ती वंदन अधिनियम दुरुस्ती विधेयक मंजूर होऊ शकले नाही. या विधेयकाच्या माध्यमातून मोदी सरकार आपला राजकीय स्वार्थ साधत असल्याचा आरोप करत विरोधकांनी एकजूट होऊन या विधेयकाच्या विरोधात मतदान केले. दक्षिणेतील सर्व पक्षांनी एकत्र येत या विधेयकाल विरोध केला. हे विधेयक नामंजूर होणे म्हणजे मोदी सरकारला हा मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे. असे असतानाच आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर लाईव्ह येत देशाशी संवाद साधला. देशातील महिला आता विरोधकांना कधीच माफ करणार नाहीत, असे मोदी म्हणाले. तसेच काँग्रेस हा पक्ष सुधारणांना विरोध करणारा पक्ष आहे, असा हल्लाबोल केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आम्ही खूप प्रयत्न केला, तरी आम्ही यशस्वी होऊ शकलो नाही. नारी शक्ती वंदन अधिनियमात दुरुस्ती होऊ शकली नाही. त्यासाठी मी सर्वा माता-भगिनींची माफी मागतो. आमच्यासाठी देशहीत सर्वोच्च आहे. (पान ४ वर)

## संमिश्र

### भारतीय तेल टँकरवर गोळीबार


**नवी दिल्ली :** शनिवारी दुपारी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन व्यापारी जहाजांवर गोळीबार झाला. यापैकी एक भारतीय ध्वज असलेले तेलवाहू जहाज होते. ही माहिती अनेक सागरी आणि सुरक्षा सूत्रांनी दिली असून, टँकरट्रॅकर्स या शिपिंग मॉनिटरने ही बातमी दिली आहे. हिंदुस्तान टाइम्सच्या वृत्तानुसार, भारतीय जहाज अंदाजे वीस लाख बॅरल इराकी तेल घेऊन जात होते. यूकेच्या सागरी देखरेख केंद्र, मेरिटाइम ट्रेड ऑपरेशन्स सेंटरनुसार, इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्ड्सच्या दोन गनबोट्सनी कोणताही रेडिओ इशारा न देता टँकर्सजवळ येऊन गोळीबार केला. त्यानंतर, दोन्ही जहाजे सामुद्रधुनी न ओलांडता परत फिरली.

### मुंढवा जमीन घोटाळ्यात ट्विस्ट!

**पुणे :** पुण्यातील मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असलेल्या शीतल तेजवानीला मोठा दिलासा मिळाला आहे. उच्च न्यायालयाने तिची अटक आणि रिमांड प्रक्रियेत गंभीर त्रुटी आढळल्याचे नमूद करत जामीन मंजूर केला आहे. विशेष म्हणजे, बावधन पोलिसांच्या कामकाजातील हलगर्जीपणाचा फायदा तेजवानीला झाल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. या निर्णयामुळे पोलिसांच्या तपास पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात पोलिसांनी अटकेपूर्वी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करताना अनेक चुका केल्याचे समोर आले आहे.

### गांधींविरोधातील आदेशाला स्थगिती

**नवी दिल्ली :** अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठाने खासदार राहुल गांधींविरोधात एफआयआर नोंदवण्याच्या स्वतःच्याच आदेशाला स्थगिती दिली आहे. हे प्रकरण दुहेरी नागरिकत्वाशी संबंधित आहे. न्यायालयाने शनिवारी आपल्या वेबसाइटवर जारी केलेल्या आदेशात ही माहिती दिली. न्यायालयाने सांगितले की, शुक्रवारी (१७ एप्रिल) सुनावणी झाली होती. यामध्ये याचिकाकर्त्यासह केंद्र आणि राज्य सरकारच्या वकिलांना विचारण्यात आले होते की, राहुल गांधींना नोटीस बजावण्याची गरज आहे का? वकिलांनी नोटीस बजावण्याची कोणतीही गरज नसल्याचे सांगितले होते. त्यानंतर एफआयआर नोंदवण्याचा आदेश पारित करण्यात आला होता.




## वांबोरी दुष्काळमुक्त करण्यासाठी सरकार कटिबद्ध

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील; वांबोरी गटात कर्डिलेंच्या प्रचारार्थ जाहीर सभा




केंद्रातील भाजप सरकारने महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्याचा प्रयत्न केला, मात्र काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांच्या खासदारांनी त्याला विरोध केला. हा पराभव नरेंद्र मोदी सरकारचा नसून देशातील महिलांचा आहे. त्यामुळे राहुरी पोटनिवडणुकीत महिला या विरोधकांना धडा शिकवतील.

**– डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राज्यातील महायुती सरकार म्हणून आम्ही जनतेचे प्रश्न सोडवण्याचे काम करत आहोत. वांबोरी परिसरातील पाण्याचे योग्य नियोजन करून हा भाग दुष्काळमुक्त करण्यासाठी प्रयत्न केले जातील. वांबोरी गटातील जनता नेहमीच आमच्यासोबत राहिली असून याही निवडणुकीत अक्षय कर्डिले यांना सर्वाधिक मते मिळतील, असा विश्वास पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

राहुरी – पाथर्डी – नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ वांबोरी गटातील कार्यकर्त्यांची जाहीर सभा उत्साहात संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.

या सभेत कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अक्षय कर्डिले यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले की, स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी सुरू केलेल्या विकासकामांचा वारसा पुढे नेण्याचे (पान ४ वर)

## कळमकरांचा शोध अजूनही अधांतरी

**जनता आवाज वृत्तसेवा**


**अहिल्यानगर :** नोकरीच्या आमिषाने दोन महिलांवर अत्याचार करून गुन्हा दाखल होताच पसार झालेला माजी महापौर अभिषेक बाळासाहेब कळमकर (रा. भुतकरवाडी चौक, सावेडी) यास न्यायालयात हजर राहण्याबाबत जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला आहे. कळमकर सुमारे दोन महिन्यांपासून पसार असून त्याचा शोध घेण्याचे प्रयत्न निष्फळ ठरल्याने (पान ४ वर)

### अन्यथा कळमकरांच्या मालमत्तेवर जप्ती

सुमारे दोन महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतर देखील अभिषेक कळमकर पोलिसांना सापडत नसल्याने न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, संशयित आरोपी अभिषेक कळमकर हा न्यायालयासमोर हजर न राहिल्यास त्यास फरार आरोपी घोषित करण्यात येईल. तसेच पुढील टप्प्यात त्याच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

## अपराधसिद्धीला प्राधान्य द्या

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे पोलिसांना कडक निर्देश



### तपासात अपराधसिद्धीच महत्त्वाचा घटक

मुख्यमंत्र्यांनी अशोक खरात प्रकरणात पीडित महिलांच्या सुरक्षेवर प्राधान्यक्रमाने भर दिला. ते म्हणाले, प्रस्तुत प्रकरणातील पीडित महिलांना संपूर्ण विश्वास द्या. या प्रकरणी कुणीही दोषी असो त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. कोर्टात ही केस मजबूत कशी होईल, हे निश्चित करण्यासाठी भक्कम पुरावे शोधा. तपासात अपराधसिद्धी हाच एकमेव महत्त्वाचा घटक असला पाहिजे.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** भोंदू अशोक खरात प्रकरणात प्रकरणात कुणीही दोषी असला तरी त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. त्यासाठी या प्रकरणात भक्कम पुरावे गोळा करा. तपासात अपराधसिद्धी हाच महत्त्वाचा घटक असला पाहिजे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांना दिले आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी गृहविभागाची तातडीची आढावा बैठक घेतली. त्यात त्यांनी नाशिकच्या भोंदू अशोक खरात व आयटी धर्मांतर प्रकरणासह परतवाडा व गोरेगाव ड्रग्ज प्रकरणाच्या तपासाचा विस्तृत आढावा घेतला.

या बैठकीला पोलिस महासंचालक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, एसआयटी प्रमुख व इतर वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री प्रस्तुत प्रकरणांत आरोपी कोण आहेत? हे न पाहता संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिल्याचा दावा (पान ४ वर)

## पुलाच्या दुरुस्तीला हिरवा कंदील

### आ. आशुतोष काळेंच्या पाठपुराव्याला अखेर यश



### पुलासाठी आ. काळेंची धडपड यशस्वी

संवत्सरच्या पुलाचे दुरुस्तीबाबत आ. आशुतोष काळे यांनी मागील महिन्यात केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली होती आणि एक महिना पूर्ण होत नाही तोच या पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवातही झाली आहे. त्यामुळे पाठपुरावा करतांना तो पाठपुरावा किती पोटतिडकीने करायचा आणि जनतेची कामे तातडीने कशी मार्गी लावायची हे आ. काळे यांच्याकडून शिकण्यासारखे आहे.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या जुन्या मुंबई-नागपूर महामार्गावरील संवत्सर येथील पुलाला मध्यभागी भगदाड पडल्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीमुळे ह्या पुलावरून होणारी वाहतूक थांबविण्यात येवून मुंबई-नागपूर महामार्गावरील वाहतूक थांबली होती. त्याबाबत मागील महिन्यात दि. १८ मार्च रोजी केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दिल्ली येथे त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्याकडे या पुलाच्या दुरुस्तीची मागणी केली होती. त्या पाठपुराव्याला यश आले असून संवत्सरच्या पुलाचे दुरुस्तीचे काम सुरु झाले असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली आहे.

वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला व राज्यातील प्रमुख शहरांना जोडणाऱ्या जुन्या मुंबई-नागपूर महामार्गावरील संवत्सर येथील गोदावरी नदीवरील पुलावर काही ठिकाणी खड्डे पडल्यामुळे मागील काही महिन्यांपासून या महामार्गावरून होणारी वाहतूक बंद करण्यात आली होती.

तत्पूर्वी अहिल्यानगर ते सावळीविहीर महामार्गाचे काम जलद गतीने व्हावे, (पान ४ वर)

## जगतापांच्या स्मरणार्थ आज ‘रामकथा’


### दि. १९ ते २१ एप्रिल दरम्यान काका ट्रस्टचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ प्रसिद्ध कवी आणि रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांच्या अपने-अपने राम या संगीतमय रामकथेचे आयोजन अहिल्यानगर शहरामध्ये करण्यात आले आहे. काका ट्रस्ट या सेवाभावी संस्थेच्या वतीने स्व. अरुणकाका जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त या रामकथेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती काका ट्रस्टचे राजेश भंडारी यांनी दिली.

रामकथा सोहळ्याची अधिक माहिती देताना नगरसेवक विकी जगताप म्हणाले की, देशात लोकप्रिय असलेले रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांच्या रसाळ वाणीतून श्रीराम कथेची दुर्लभ पर्वणी नगरकरांना प्राप्त होणार आहे. या सोहळ्यासाठी सहकार सभागृहा समोरील राष्ट्रीय पाठशाळेच्या भव्य प्रांगणात जर्मन हँगर पद्धतीचा वॉटर फ्रुफ २०० फुट बाय ५०० फुटाचा भव्य मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपात हजारो भाविकांची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच आकर्षक सजावट असलेले व्यासपीठ उभारण्यात आले आहे.

मंडपात लाईट, स्पीकर व ठिकठिकाणी एलईडी वॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच कार्यक्रमस्थळी तातडीच्या वैद्यकीय उपचार, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन याचबरोबर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह व्यवस्थेसह इतर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भाविकांच्या दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगची सुटसुटीत व्यवस्था जवळच करण्यात आली आहे.



आज, दि. १९ ते २१ एप्रिल दरम्यान दररोज सायंकाळी ६ ते ९ यावेळेत नगर शहरातील आनंदधाम रस्त्यावरील राष्ट्रीय पाठशाळेच्या भव्य प्रांगणात ही संगीतमय रामकथा होणार आहे. नगरमधील सर्वात मोठ्या ठरणाऱ्या या रामकथेच्या कार्यक्रमाची तयारी सचिन जगताप व आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्णत्वास येत आहे. सर्व भाविकांसाठी हा रामकथेचा सोहळा खुला आहे.

**– राजेश भंडारी, काका ट्रस्ट**

गणेश गोंडाळ म्हणाले की, स्व. अरुणकाका जगताप यांनी जीवनात कायम अन्न दानाला महत्व दिले होते. त्यांच्या पश्चात हा वारसा पुढे चालवत आहोत. काका ट्रस्टच्या वतीने तीन दिवसीय राम कथेसाठी आलेल्या हजारो भाविकांची दररोज महाप्रसादाची सोय मुख्य मंडपा शेजारीच करण्यात आली आहे. यासाठी स्वतंत्र मोठ्या मंडपाची व्यवस्था करण्यात आला आहे. शशीकांत घीगे म्हणाले की, कुमार विश्वास हे त्यांच्या देश व भक्तिमय कवितांसाठी लोकप्रिय असून त्यांनी रामकथेच्या माध्यमातून त्यांनी देशवासीयांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे कुमार विश्वास यांची रामकथेचा कार्यक्रम प्रत्यक्ष पाहणे, (पान ४ वर)



## संगमनेरात सशस्त्र दरोडेखोरांचा धुमाकूळ

### सोन्यासह लाखोंची रोकड लंपास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर आणि आश्वी बुद्रुक परिसरात काल, शनिवारी पहाटे सशस्त्र दरोडेखोरांनी मोठा धुमाकूळ घातला. एकाच रात्री चार वेगवेगळ्या ठिकाणी घरफोड्या करून चोरट्यांनी अंदाजे १० ते १५ तोळे सोने आणि सव्वा दोन लाख रुपयांची रोकड लंपास केली आहे. या घटनेत दरोडेखोरांनी एका वृद्ध महिलेच्या कानातील दागिने जबरदस्तीने ओरबाडल्याने त्यांचे कान फाटून त्या गंभीर जखमी झाल्या आहेत. या भीषण प्रकारामुळे संपूर्ण परिसरात (पान ४ वर)

# मुख्याधिकाऱ्यांविरुद्ध नगरसेवकांचे 'बंड'

## आर्थिक गैरकारभाराच्या चौकशीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध उपनगराध्यक्षा व नगरसेवकांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. मुख्याधिकाऱ्यांच्या आर्थिक गैरकारभाराची सखोल चौकशी करून त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. जिल्हा सहआयुक्त नगरपालिका प्रशासन हराळ यांनी हे निवेदन स्वीकारले.

मुख्याधिकारी निखिल फराटे कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसल्याचा नगरसेवकांचा मुख्य आरोप आहे. नागरिकांच्या कामांकडे दुर्लक्ष केले जात असून, संपर्क साधल्यास ते जिल्हाधिकारी कार्यालयात असल्याचे खोटे सांगितले जाते. प्रत्यक्षात ते तिथेही नसतात, असे निवेदनात म्हटले आहे. यामुळे शहरातील प्रशासकीय कामे पूर्णपणे विस्कळीत झाली आहेत.

नगरपंचायतीच्या सभांचे इतिवृत्त आणि ठराव मुद्दाम लपवून ठेवले जात असल्याचा आरोप नगरसेवकांनी केला आहे. कायद्यानुसार ही माहिती देणे बंधनकारक असताना ती टाळली जात आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये झालेल्या सभेतील १२ विषयांच्या मंजुरीबाबत आणि चुकीच्या माहितीच्या आधारे घेतलेल्या प्रशासकीय मान्यतांबाबत मोठा संशय व्यक्त होत आहे.

मुख्याधिकारी हे कर्मचाऱ्यांवर दबाव टाकून अनधिकृत कामे करून घेत असल्याचा खळबळजनक आरोपही झाला आहे. याप्रकरणी चौकशी करून



दोषींवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा उपनगराध्यक्षा शालिनी सुखधान यांच्यासह जयश्री शिंदे, जितेंद्र कुऱ्हे, संभाजी धोत्रे, सागर मापारी, शहीदाबी पठाण, सोनल चव्हाण, नसरीन शेख, शोभा व्यवहारे, प्रतिभा गवळी आणि राजेंद्र काळे यांनी दिला आहे.

### पाणी दुरुस्तीवर ४० लाखांचा खर्च, तरीही नागरिक तहानलेलेच!

शहरातील पाईपलाईन दुरुस्तीवर अवघ्या ७ महिन्यांत ४० लाख रुपये खर्च झाल्याचे दाखवले आहे. मात्र, प्रत्यक्षात नागरिकांना पाण्यासाठी ७-७ दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. इतका मोठा खर्च होऊनही पाणीटंचाई का, असा सवाल करत यात मोठा आर्थिक अपहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. निवडणूक खर्चातही अनियमितता झाल्याचे निवेदनात नमूद आहे.

# गॅस पुरवठा गतिशील करा

## फुलेंची मंत्री भुजबळ यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : गोरगरीब व वंचित नागरिकांना शासनाच्या शिधा धान्याचा नियमित लाभ मिळावा, यासाठी रेशनकार्ड व ऑनलाईन प्रक्रियेमधील अडथळे तात्काळ दूर करून ती प्रक्रिया गतीमान व पारदर्शक करावी, तसेच जिल्ह्यात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही वितरणात होत असलेल्या गोंधळावर नियंत्रण आणून व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मंत्री भुजबळ शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आले असता रामदास फुले यांनी त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन हे निवेदन दिले. यावेळी त्यांनी पुरवठा विभागातील विविध त्रुटींकडे लक्ष वेधत सामान्य नागरिकांना भेडसावत असलेल्या अडचणींचा सविस्तर आढावा मांडला.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अहिल्यानगर जिल्ह्यासह तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांची रेशनकार्ड नोंदणी अद्याप पूर्ण झालेली नाही. काही नागरिकांच्या रेशनकार्डवर धान्य वितरण रखडलेले असून, अनेकांना त्यांचा हक्काचा शिधा वेळेवर मिळत नाही. रेशनकार्डसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू असून, अर्ज महिनोमहिने प्रलंबित राहतात. परिणामी, नागरिकांना खासगी एजंटकडे जावे लागते, अन्यथा त्यांचे काम मार्गी लागत नाही. या परिस्थितीमुळे गोरगरीब व गरजू कुटुंबांना अन्नधान्यापासून वंचित राहावे लागत असल्याची गंभीर बाब फुले यांनी अधोरेखित केली आहे.

यावेळी आण्णासाहेब शेलार, भगवान फुलसौंदर, नागेश गवळी, अंबादास गारुडकर, सुभाष लोंढे, अभिषेक चिपाडे, ब्रिजेश ताठे, प्रसाद भडके, देवेंद्र दुधाले, विश्वास शिंदे, शरद जाधव, अनुराग पडोळे, अभय पडोळे, शुभम आव्हाड, स्वप्निल राऊत, निखिल ताठे, विशाल सुडके, अमृत क्षीरसागर, गणेश पडोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# मंथन परीक्षेत पांढरकरवाडी शाळेचे सुयश

## १२ पैकी ४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : नुकताच जाहीर झालेल्या मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेच्या निकालात पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पांढरकरवाडी या ग्रामीण भागातील छोट्याशा शाळेने उल्लेखनीय यश मिळवले आहे. अवघ्या १२ विद्यार्थ्यांची पटसंख्या असलेल्या या शाळेतील तब्बल ४ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेचा आणि गावाचा अभिमान वाढवला आहे.

इयत्ता ४ थीच्या तेजस विलास पांढरकर याने २६२ गुण मिळवत जिल्ह्यात १५ वा क्रमांक पटकावला. शिवन्या वसंत पांढरकर हिने २५६ गुण मिळवत जिल्ह्यात १८ वा क्रमांक मिळवला, तर स्वराज






वसंत पांढरकर याने २५४ गुण मिळवत जिल्ह्यात १९ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.

तसेच इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी अन्वी सुनिल गारुडकर हिने ११६ गुण मिळवत जिल्ह्यात १३ वा क्रमांक मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

या यशामुळे पांढरकरवाडी शाळेचे नाव जिल्ह्यात सर्वदूर पोहोचले असून ग्रामीण भागातील शिक्षणाच्या गुणवत्तेचे उत्तम उदाहरण निर्माण झाले आहे.

या विद्यार्थ्यांचे शिवसेनेचे पारनेर तालुका शेतकरी सेनेचे प्रमुख महेंद्र पांढरकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वसंतराव पांढरकर, उपाध्यक्ष शरद पांढरकर, विलास पांढरकर, जनार्दन पांढरकर, सुनिल गारुडकर, नितीन पांढरकर, गोपीनाथ पांढरकर, सुरेश रासकर, तुकाराम पांढरकर, रविंद्र पांढरकर, भाऊसाहेब पांढरकर, शहाजी वराळ यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन करून कौतुक केले. या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका सविता भालेकर आणि मुख्याध्यापक बाळासाहेब थोपटे यांचे मार्गदर्शन लाभले.

# प्रीतिसुधाजी स्कूलचा झळाळता निकाल

## प्रीतिसुधाजी स्कूलचा दहावी सीबीएसई निकाल १०० टक्के

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त आणि संस्कारांसाठी महाराष्ट्रभर ओळखल्या जाणाऱ्या राहाता येथील प्रीतिसुधाजी इंटरनॅशनल स्कूलने यंदाही आपल्या उज्ज्वल परंपरेला साजेसं यश मिळवत इयत्ता १० वी सीबीएसई परीक्षेत १०० टक्के निकालाची नोंद केली आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत शाळेचा लौकिक अधिक उंचावला आहे.

या घवघवीत यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा स्नेहलता डांगे, उपाध्यक्ष शशीकांत डांगे, कार्याध्यक्ष भगवानराव डांगे, प्राचार्य ज्ञानेश डांगे, संचालिका पूनम डांगे तसेच डॉ. मधुकर देशमुख, डॉ. पांडुरंग गुंजाळ यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

यंदाच्या निकालात गाडे शिवराज याने ९६.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. कायस्थ ओम याने ९५.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर साबळे ऐश्वर्या हिने ९३.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. पाटील मितेश आणि रणमाळे हर्षवर्धन यांनी प्रत्येकी ९०.८० टक्के गुण मिळवत अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक पटकावला.

इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये बहात्तरे रुद्धी (९०.६०%), वणवे वैष्णव (९०%), फड अनुष्का (८९%), रिंढे प्रज्ज्वल (८८.४०%) आणि सोनवणे चैतन्य (८७.८०%) यांचा समावेश आहे.

निकालाच्या टक्केवारीनुसारही शाळेने उल्लेखनीय यश मिळवले आहे. ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे ७ विद्यार्थी, ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे १५ विद्यार्थी तर ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे १८ विद्यार्थी आहेत. केवळ ३ विद्यार्थी ७० टक्क्यांपेक्षा कमी गुणांनी उत्तीर्ण झाले असून एकूण निकाल अत्यंत भक्कम ठरला आहे.

सीबीएसई विभागाच्या प्राचार्या डॉ. पूर्वी हलपती, रविकिरण पाटील, प्रीतम तोरडमल, तुषार वैद्य, महेश वक्ते, आम्रपाली कांदळकर, चैताली सोनवणे आदी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या यशासाठी विशेष परिश्रम घेतले.



> प्राचार्य डांगे पॅटर्नचे जनक स्व. इंद्रभानजी डांगे यांनी घालून दिलेला आदर्श या निकालातून स्पष्टपणे दिसून येतो. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास यामुळे हे यश मिळाले आहे.
>
> **- ज्ञानेश डांगे, प्राचार्य**

या यशाबद्दल शिवाजीराव डांगे, निवृत्त पोलिस अधिकारी मेघश्याम डांगे, शिवाजी देवढे तसेच राहाता प्रेस क्लबच्या सदस्यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत चैतन्य आगळे प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**



**भातकुडगाव फाटा**: काही महिन्यापूर्वी झालेल्या राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध सामान्य ज्ञान परीक्षेत शेवगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळेगाव (भायगाव)च्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले आहे.

शाळेतील चैतन्य शहाराम आगळे याने मंथन प्रज्ञाशोध सामान्य ज्ञान परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या स्पर्धेत शाळेतील २९ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. त्यामध्ये इयत्ता तिसरीची स्वरा प्रदीप लांडे, मयुरी संभाजी कडूस, इयत्ता चौथीची त्रिवेणी गणेश लोखंडे, साई लक्ष्मण पिंगळे तर इयत्ता दुसरीची सोनाक्षी सुभाष जऱ्हाड, श्रावणी वाल्मीक दुकळे, साई गणेश शेकडे या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विशेष प्रविण्य मिळवले आहे. विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक संदीप आहेर, उपमुख्याध्यापक लक्ष्मण पिंगळे, भायगावचे सरपंच राजेंद्र आढाव, कल्याण आढाव, ॲड. सागर चव्हाण, पोलीस पाटील बबन सौदागर, शहाराम आगळे, रामेश्वर शेकडे, प्रदीप लांडे, ज्ञानेश्वर वडणे, संभाजी कडूस, तुकाराम लांडे, गणेश लोखंडे, रावसाहेब जऱ्हाड, गणेश दुकळे, नानासाहेब लांडे, आदिनाथ आढाव, नामदेव लोखंडे, अंबादास सांगळे, रोहिदास म्हसरूप यांनी अभिनंदन केले आहे.

# मातापूरमध्ये जगदंबा माता यात्रोत्सव जल्लोषात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : मातापूर येथील जागृत देवस्थान आणि नवसाला पावणारे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री जगदंबा माता यांचा वार्षिक यात्रा उत्सव यंदा मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात पार पडला. धार्मिक विधी, कुस्ती स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी हा उत्सव अधिकच रंगतदार झाला.

उत्सवाची सुरुवात बुधवारी रात्री ८ वाजता मानाचा पाळणा व विधिवत पूजाअर्चेने झाली. त्यानंतर देवीची भव्य छबिना मिरवणूक काढण्यात आली. मंगळवारी रात्रीही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

देवीच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. संपूर्ण



मंदिर परिसर आई साहेबांच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

यात्रेतील कुस्ती स्पर्धा हे मुख्य आकर्षण ठरले. बुधवारी सायंकाळी ५ वाजता पार पडलेल्या या भव्य कुस्ती मैदानात मल्लांनी दमदार चुरस दाखवली. विजेत्या मल्लांना ५ सायकली देऊन गौरविण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. परिसरातील कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामन्यांचा आनंद घेतला.

यात्रेची सांगता प्रसिद्ध लावणी कलावंत सायली पाटील यांच्या लोकगीतांच्या कार्यक्रमाने झाली. त्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. लोकगीत आणि नृत्याच्या बहारदार सादरीकरणामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

जगदंबा माता यात्रा कमिटी आणि मातापूर ग्रामस्थांच्या अथक परिश्रमामुळे हा उत्सव अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला. या आयोजनाबाबत भाविकांनी समाधान व्यक्त केले.

# दरोड्याच्या तयारीतील चौघांना अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**घारगाव** : पठार भागात डिझेल चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर घारगाव पोलिसांनी रात्रगस्तीदरम्यान मोठी कारवाई करत दरोड्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांच्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चौघांना अटक करण्यात आली असून एक आरोपी अंधाराचा फायदा घेत फरार झाला आहे. पोलिसांनी चार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून डिझेल चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही कारवाई मंगळवारी पहाटे साडेतीन वाजता पुणे–नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील डोळासणे गावाजवळील बोगद्याजवळ घडली. घारगाव पोलिस ठाण्याचे पोलीस कर्मचारी पो.कॉ. सुभाष बोडखे आणि चालक पो.कॉ. दत्तात्रय आंधळे हे रात्रगस्त करत असताना त्यांना एक संशयास्पद पांढऱ्या रंगाची स्विफ्ट कार दिसून आली. कारमध्ये काही इसम संशयास्पदरीत्या बसलेले असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ वरिष्ठांना माहिती दिली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये जिवन दत्तात्रय कांदे (रा. श्रीरामपूर), एक विधी संघर्षग्रस्त बालक (रा. वाकडी, श्रीरामपूर), आशिष अनिल पवार (रा. येवला, सध्या नेवासा फाटा) आणि दानिश सत्तार शेख (रा. श्रीरामपूर, सध्या संगमनेर) यांचा समावेश आहे. तर रितेश वसंत सदाफळ (रा. राहता) हा फरार आहे.

# हरणाबाई सालके यांचे निधन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संदीपराव सालके यांच्या मातोश्री हरणाबाई लक्ष्मण सालके यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात बाळासाहेब, पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे नूतन उपसभापती संदीपराव, सुहास, सुधीर ही ४ विवाहीत मुले, पुतणे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

# प्रेमाच्या दबावातून विद्यार्थिनीचा अंत

## विद्यार्थिनीची विष प्राशन करून आत्महत्या; तरुणावर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यातील एका २१ वर्षीय विद्यार्थिनीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संबंधित युवकाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा पाथर्डी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून, घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत विद्यार्थिनी ही शेवगाव येथील एका महाविद्यालयात एमसीएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत होती. कुटुंबीय शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करत असून, ती शिक्षणासोबत घरच्या जबाबदाऱ्याही सांभाळत होती. दरम्यान, पाथर्डी तालुक्यातील ढवळेवाडी येथील यज्ञेश वाळके या युवकाने तिला वारंवार फोन करून लग्नासाठी दबाव टाकत असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

तसेच, या युवकाने संबंधित विद्यार्थिनीचे इतर ठिकाणी ठरलेले लग्न मोडण्यासाठी तिच्या नातेवाईकांनाही फोन करून माझे तिच्यावर प्रेम आहे, तिचे लग्न लावू नका, असे सांगितल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे विद्यार्थिनी व तिच्या कुटुंबीयांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

दि. १४ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास संबंधित युवकाचा फोन आला होता. त्यानंतर १६ एप्रिल रोजी सकाळी व सायंकाळी त्याने पुन्हा संपर्क साधण्याचा

**एमसीएसच्या प्रथम वर्षात होती शिक्षण घेत**

प्रयत्न केला. सायंकाळी सुमारे साडेचार वाजण्याच्या सुमारास विद्यार्थिनीने त्या युवकाशी काही मिनिटे संवाद साधल्याचे समोर आले आहे. या संभाषणानंतर अल्पावधीतच तिने घरातच विषारी औषध प्राशन केले.

घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी तिला तातडीने शेवगाव येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तिच्यावर उपचार सुरू केले; मात्र प्रकृती गंभीर असल्याने १७ एप्रिल रोजी पहाटे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.




### तरुणावर गुन्हा दाखल; तपास सुरू

तरुणीच्या आत्महत्येप्रकरणी कुटुंबीयांनी दिलेल्या फिर्यादीवरून यज्ञेश वाळके या युवकाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, विद्यार्थिनीच्या मृत्यूने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# भर उन्हात उदयन गडाखांचा विद्यार्थ्यांशी संवाद

## हंडीनिमगाव-बेलपिंपळगाव परिसरात हृदयस्पर्शी प्रसंग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**हंडीनिमगाव** : नेवासा तालुक्यात सध्या तापमानाने ४० अंशांचा पारा ओलांडला असून प्रचंड उष्णतेतही बेलपिंपळगाव येथील शालेय विद्यार्थी नियमितपणे शाळेकडे जात होते. याच दरम्यान दौऱ्यावर असलेले युवा नेते उदयन गडाख यांची नजर या विद्यार्थ्यांवर पडली आणि त्यांनी तात्काळ आपला ताफा थांबवत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

भर उन्हातही विद्यार्थ्यांप्रती दाखवलेल्या या आपुलकीमुळे परिसरात एक वेगळाच भावनिक क्षण अनुभवायला मिळाला. उदयन गडाख यांनी विद्यार्थ्यांना जवळ घेत त्यांच्या शैक्षणिक जीवनाबद्दल, स्वप्नांबद्दल तसेच



भविष्यातील उद्दिष्टांबद्दल सविस्तर विचारपूस केली. विद्यार्थ्यांनीही कोणतीही भीती न बाळगता आत्मविश्वासाने त्यांना उत्तरे दिली. या संवादादरम्यान त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता. उदयन गडाख यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. हा संवाद केवळ औपचारिक नसून तो आपुलकी, जिव्हाळा आणि प्रेरणा देणारा असल्याचे उपस्थितांनी सांगितले. राजकारणाच्या पलीकडे जाऊन निर्माण झालेल्या या नात्यामुळे परिसरात सकारात्मक चर्चा रंगली असून, अशा क्षणांतूनच विद्यार्थ्यांना आत्मविश्वास आणि योग्य दिशा मिळते, असे मत नागरिकांनी व्यक्त केले. उदयन गडाख आणि विद्यार्थ्यांच्या या भेटीची सध्या नेवासा तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे.

# कर्करोग बरा करतो, मूल देतो म्हणणारा भोंदू बाबा गजाआड

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तक्रारीनंतर संगमनेर पोलिसांची कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : कर्करोगासारखे दुर्धर आजार मंत्राने बरे करतो, मूल नसलेल्या महिलांना मूल प्राप्त करून देतो, घरातील समस्या दूर करतो असे सांगून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबाला संगमनेर तालुका पोलिसांनी अटक केली. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



राजेंद्र बापू गडगे (रा. वडगावपान, ता. संगमनेर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्यासह डॉ. मोहन पुरी, ज्ञानेश्वरी गडगे, सूरज शिंदे आणि मधूकर शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बुवाबाजी संघर्ष विभागाच्या राज्य सचिव ॲड. रंजना पगार-गवांदे यांनी याबाबत फिर्याद दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली.

शुक्रवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल झाल्यानंतर सोमनाथ वाघचौरे, डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रवीण साळुंखे आणि त्यांच्या पथकाने वडगावपान येथून राजेंद्र गडगे याला अटक केली. वडगावपान येथील या भोंदूगिरीबाबत राज्यभरातून तक्रारी आल्याने अंधश्रद्धा निर्मूलन समितीने जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी केली होती. दरम्यान, समितीविरोधात बदनामीकारक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र नरबळी व अघोरी प्रथा प्रतिबंधक कायदा २०१३ तसेच ड्रग्स अँड मॅजिक रेमिडीज क्ट आणि मेडिकल प्रॅक्टिशनर क्टच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रवीण साळुंखे करीत आहेत.

# भावनिक निरोपात आठवणींची शिदोरी

## आदिनाथनगर फार्मसी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण निरोप समारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यातील आदिनाथनगर येथील श्री दादा पाटील राजळे शिक्षण संस्थेच्या लोकनेते आप्पासाहेब राजे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये द्वितीय वर्ष डी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण तसेच भावनिक वातावरणात पार पडला.



विद्यार्थ्यांच्या आठवणींनी भरलेला हा कार्यक्रम मैत्री, कृतज्ञता आणि भावनिक क्षणांनी ओतप्रोत भरला होता. यावेळी प्राचार्य डॉ. शांताराम खणगे, प्रा. अंबादास कटरनवरे, प्रा. सौरभ सौदर, प्रा. अपेक्षा फुंदे, प्रा. सोनल शहरवाले, प्रा. विकास गव्हाणे, प्रा. मयूर जोशी, प्रा. हृषिकेश वराडे, प्रा. पुनम घोरपडे, प्रा. ऋषिकेश वांढेकर, प्रा. प्रज्ञा शिंदे, प्रा. दीपली चितळे, प्रा. सरिता पवार आणि प्रा. रामचंद्र हंडाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. शांताराम खणगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळविण्यावर थांबू नये, तर ज्ञानाचा सातत्याने पाठपुरावा करावा. औषधनिर्मिती क्षेत्रात काम करताना प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि नैतिकतेचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत नवीन कौशल्ये आत्मसात करत अपयशातून शिकत पुढे जाण्याची जिद्द ठेवावी.

समाजाच्या आरोग्यसेवेत योगदान देणे ही विद्यार्थ्यांची मोठी जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत कॉलेजमधील आठवणींना उजाळा दिला. अनेक विद्यार्थिनींनी एकत्र घालवलेले दिवस, शिक्षणातील अनुभव आणि मैत्रीचे नाते यांचा उल्लेख करत पुढील आयुष्यात वेगवेगळ्या वाटा जरी निवडाव्या लागल्या तरी या आठवणी कायम राहतील, अशी भावना व्यक्त केली. 'पुढे पुन्हा भेट होईल का?' या प्रश्नाने वातावरण अधिकच भावनिक झाले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शिक्षणातून मिळालेला आत्मविश्वास आयुष्यभर उपयोगी पडेल, असे सांगितले. या कार्यक्रमास सतीश काकडे, विकास वाघ, विशाल चितळे, अश्विनी राजळे, महेश डांगे, तेजस काकडे, प्रसाद चितळे, सुजाता शिंदे, योगेश चितळे, लक्ष्मण लवांडे व अरुण ताठे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा. रामचंद्र हंडाळ यांनी मानले.

संस्थेच्या विश्वस्त आमदार मोनिका राजळे, राहुल राजळे, कृष्णा राजळे आणि भास्कर गोरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# बेलापूरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

## मिरवणूक, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**जनता आवाज वृतसेवा**

**बेलापूर** : विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल (बेलापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यानिमित्त डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याची भव्य मिरवणूक काढण्यात आली तसेच जनजाती सेवावस्तीतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. बेलापूर येथील आझाद मैदान येथे आयोजित कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी किशोरआण्णा निर्मळ, ऋषिकेश भागवत, सुरेश महाले, वसंतराव कदम, कुलदीप ठाकुर यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यानंतर जनजाती सेवावस्तीतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास सुनील मुथा, अभिषेक खंडागळे, सावकार अमोलिक, रमेश अमोलिक यांच्यासह विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गणेश जाधव यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# उन्हाळी कांद्याला कवडीमोल दर

## उत्पादन खर्चही न निघाल्याने शेतकरी हवालदिल



एकरी ६५ ते ७० हजार रुपये खर्च करून पिकवलेल्या कांद्याला सध्या सात ते आठ रुपये किलो दर मिळत आहे. हा दर परवडत नसल्याने शेतकऱ्यांनी साठवणुकीवर भर दिला आहे. २००५ साली कांद्याला मिळणाऱ्या दराच्या आसपासच सध्याचा दर असल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत. इतर सर्व वस्तूंच्या किमती वाढतात, मात्र शेतमालाला योग्य दर मिळत नाही, अशी प्रतिक्रिया टाकळीभान येथील शेतकरी संतोष पटारे यांनी व्यक्त केली.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान** : उन्हाळी कांदा काढणीचा हंगाम जोमात सुरू असताना बाजारात कांद्याला मिळणाऱ्या कवडीमोल दरामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. मोठ्या कष्टाने आणि वाढत्या खर्चातून तयार केलेल्या कांद्याला सध्या केवळ ५०० ते ७०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांना एक एकर कांदा पिकवण्यासाठी साधारण ६५ ते ७० हजार रुपये खर्च येतो. बियाणे, खते, मशागत, फवारणी आणि मजुरीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कांदा लागवडीसाठी प्रति एकर सुमारे १५ हजार रुपये तर काढणीसाठीही तेवढाच खर्च करावा लागतो.

मात्र, बाजारातील घसरलेल्या दरामुळे वाहतूक आणि मजुरीचा खर्चही निघणे कठीण झाले आहे. सुरुवातीला पावसामुळे बियाण्यांचे नुकसान झाल्याने अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. त्यानंतर विविध संकटांवर मात करून पीक हाती आले असताना बाजारातील दर कोसळल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. भाव नसल्याने अनेक शेतकरी कांदा विक्रीऐवजी चाळीत साठवण्याचा पर्याय स्वीकारत आहेत. भविष्यात दर वाढतील, या आशेवर शेतकरी पुन्हा एकदा जोखीम घेत असल्याचे दिसत आहे. उष्णतेमुळे चाळीत कांदा जास्त दिवस टिकत नसल्याने काही शेतकऱ्यांना सात ते आठ रुपये किलो दराने तोटा सहन करून विक्री करावी लागत आहे. त्यामुळे कांद्यामुळे आर्थिक नियोजन कोलमडल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

# अजितदादा पवार पॉलिटेक्निकचा प्लेसमेंट विक्रम

## ७६ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : वडाळा महादेव येथील अजितदादा पवार कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकने पुन्हा एकदा उत्कृष्ट प्लेसमेंटचा विक्रम नोंदवत ७६ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळवून दिली आहे. पुणे येथील टाटा ऑटो कॉम्प सिस्टीम्स आणि छत्रपती संभाजीनगर येथील पेस डिजिटेक या आघाडीच्या कंपन्यांनी कॅम्पस मुलाखतीतून विद्यार्थ्यांची निवड केली. मेकॅनिकल शाखेतील ४१, इलेक्ट्रिकल शाखेतील २० तर इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेतील १३ विद्यार्थ्यांची टाटा ऑटो कॉम्प सिस्टीम्समध्ये वार्षिक २.२२ लाख रुपयांच्या पॅकेजवर निवड झाली.

तसेच पेस डिजिटेक कंपनीत सार्थक भोसले आणि संकेत शिंदे या दोन विद्यार्थ्यांची ३.६० लाख रुपयांच्या वार्षिक पॅकेजवर निवड झाली. या यशामागे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलचे प्रा. प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मॉक इंटरव्ह्यू, गटचर्चा, तांत्रिक कार्यशाळा व व्यक्तिमत्त्व विकास सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शनही विद्यार्थ्यांना देण्यात आले. प्राचार्या पूनम बोधक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत उद्योगक्षम शिक्षणावर भर दिल्याचे सांगितले.


संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, संचालक दिलीपदादा पवार, प्रशासकीय अधिकारी श्रीकांत पवार व जनसंपर्क अधिकारी सुशील लांडे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. दरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये निकालापूर्वीच विविध आठ कंपन्यांनी महाविद्यालयातील एकूण १०७ विद्यार्थ्यांची निवड केल्याने संस्थेच्या प्लेसमेंट परंपरेत आणखी भर पडली आहे.

# संजीवनी इंटरनॅशनल स्कूलचा दहावीला १०० टक्के निकाल

## स्वरीत भळगाटी याचे ९७.२० टक्क्यांसह प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित संजीवनी इंटरनॅशनल स्कूल, शिर्डी येथील इयत्ता दहावीच्या सीबीएसई परीक्षेत १०० टक्के निकाल लागला असून स्वरीत भूषण भळगाटीय याने ९७.२० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे सोशल सायन्स विषयात त्याने १०० पैकी १०० गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली.साची विरेश अग्रवाल हिने ९६ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. इंग्रजी व इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी या विषयांमध्ये तिने १०० पैकी १०० गुण मिळवले. जुई अजित पाटील हिने ९४.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. तसेच दर्श पवन भुतडा (९४ टक्के) व पृथ्वीराज माळवदे (९३.६० टक्के) यांनी अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक मिळवला. दर्श भुतडा याने इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळवले. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यावर शाळेचा भर असून नेतृत्वगुण, सर्जनशीलता व सामाजिक जाणीव विकसित करण्यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. याच प्रयत्नांचे हे यश असल्याचे शाळा प्रशासनाने नमूद केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नितिनदादा कोल्हे, अमित कोल्हे, डॉ. मनाली कोल्हे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना डॉ. रावसाहेब शेंडगे, सुंदरी सुब्रमण्यम आणि शैला झुंजारराव यांचे मार्गदर्शन लाभले.



# ६० दिवसांत घरे नियमित करा

## अन्यथा उच्च न्यायालयात याचिका - मनसेचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरूर** : शहरातील ३५ ते ४० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या कष्टकरी कुटुंबांची घरे नियमित करण्याची कार्यवाही ६० दिवसांत करावी, अन्यथा उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा ड. स्वप्नील माळवे यांनी शिरूर नगर परिषद प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून दिला आहे. इंदिरानगर, शांतिनगर, सिद्धार्थनगर, सय्यदबाबा नगर, साईनगर व संजयनगर या भागांतील सुमारे ४०० कष्टकरी कुटुंबे गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास आहेत.



शासनाचे स्पष्ट निर्णय असतानाही या घरांचे नियमितीकरण झालेले नसल्याने नगर परिषद प्रशासनाला कायदेशीर नोटीस बजावण्यात आल्याचे माळवे यांनी सांगितले. १६ मे २०१५, १७ नोव्हेंबर २०१८ तसेच २५ मार्च २०२६ रोजीच्या सुधारित शासन निर्णयानुसार, १ जानेवारी २०११ पूर्वीची सरकारी किंवा नगर परिषद जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचे निर्देश आहेत. मात्र, शिरूर नगर परिषदेकडून अद्याप बायोमेट्रिक सर्वेक्षण अथवा पात्रता निश्चिती प्रक्रिया राबवण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. रहिवाशांकडे घरपट्टी पावत्या, वीज बिले आणि निवडणूक ओळखपत्रे यांसारखे पुरावे उपलब्ध असूनही प्रशासनाने कोणतीही दवंडी दिली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामुळे रहिवाशांच्या 'निवारा' या मूलभूत हक्काचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात आला.

६० दिवसांत सकारात्मक निर्णय न झाल्यास झोपडीधारकांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात येईल, तसेच न्यायालयीन प्रक्रियेची जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही ड. माळवे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शिरूरमधील कष्टकरी व अल्प उत्पन्न गटातील सुमारे ४०० कुटुंबांच्या घरांच्या नियमितीकरणाचा प्रश्न प्रलंबित राहिल्याने आता नगर परिषद प्रशासन काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अहिल्यानगरात 'ग्रामीण एआय समिट २०२६'

## तंत्रज्ञानातून ग्रामीण विकासाचा रोडमॅप




**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवक, शेतकरी व उद्योजकांसाठी नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २४ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथे 'ग्रामीण एआय समिट २०२६' आयोजित करण्यात आले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत नितीन उदमले यांनी व्यक्त केले.

नितीन उदमले फाउंडेशन यांच्या वतीने आणि द डेटा टेक लॅब्स, पुणे यांच्या सहकार्याने हा समिट शुक्रवार (दि. २४ एप्रिल) रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत माऊली संकुल, सावेडी येथे पार पडणार आहे. समिटच्या उद्घाटन प्रसंगी संग्राम जगताप, सोमनाथ घार्गे, आनंद भंडारी, शरद जरे, डॉ. अमित आंद्रे, सुधाकर बोराळे, राजेंद्र पाटील, विजय मुळीक आणि वैभव कलुबर्मे उपस्थित राहणार आहेत. समिटमध्ये ग्रामीण एआय, डेटा सुरक्षा, औद्योगिक संधी, ग्रामीण उद्योजकता, आरोग्य, फिल्म मेकिंग, सोशल मीडिया मार्केटिंग आणि कृषी क्षेत्रातील एआयचा वापर या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

रवींद्र पाल सिंग, डॉ. आनंद कुलकर्णी, डॉ. स्मिता काळे, डॉ. निरंजन देशमुख, अमित सिंग आणि सचिन पांचाळ मार्गदर्शन करणार आहेत. ग्रामीण भागातील युवक, शेतकरी, विद्यार्थी आणि उद्योजकांसाठी एआयच्या माध्यमातून नवीन रोजगार, स्टार्टअप आणि विकासाच्या संधी निर्माण करण्याचा या समिटचा उद्देश आहे. या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' ; वादळी पाऊस, वीजांचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतीय हवामान विभाग यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात १८ एप्रिल ते २२ एप्रिल दरम्यान तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम पाऊस तसेच सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला असून नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन अहिल्यानगर जिल्हा प्रशासन यांनी केले आहे. वादळी वाऱ्यासह विजांच्या धोक्याचा अंदाज लक्षात घेऊन प्रशासनाने नागरिकांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. मेघगर्जना होत असताना झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत थांबू नये, विद्युत उपकरणांचा वापर टाळावा तसेच ट्रॅक्टर, दुचाकी, धातूची साधने यांपासून दूर राहावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

तसेच टॉवर्स, ध्वजाचे खांब, विद्युत खांब, ट्रान्सफॉर्मर, धातूचे कुंपण तसेच लोंबकळणाऱ्या केबल्सपासून सुरक्षित अंतर राखण्याचा सल्ला देण्यात आला आहे. जोरदार वाऱ्यामुळे जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळण्याचा धोका असल्याने अशा ठिकाणी थांबणे टाळावे, असेही प्रशासनाने नमूद केले आहे. वीजांचा कडकडाट सुरू असताना मोकळ्या जागेत अडकले असल्यास नागरिकांनी गुडघ्यावर बसून डोके खाली घेऊन कान झाकावेत आणि जमिनीशी संपर्क कमी ठेवावा, अशी आपत्कालीन सुरक्षा सूचना देण्यात आली आहे. धरण, नदी व कालवा परिसरात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. पाण्याच्या प्रवाहात उतरू नये तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी घेणे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी पिकांचे संरक्षण, शेतमाल सुरक्षित साठवणूक तसेच जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने सांगितले असून मदतीसाठी टोल फ्री क्रमांक १०७७ तसेच ०२४१-२३२३८४४ आणि ०२४१-२३५६९४० हे दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# संपादकीय

## युद्धकाळातील आर्थिक धडा

आखाती युद्ध हा भारतासाठी जागतिक घडामोडींवर अवलंबून राहण्याचा परिणाम दाखवणारा इशारा ठरला. या संकटाकडे केवळ तात्पुरत्या अडचणी म्हणून पाहणे पुरेसे नाही; तर त्यातून दीर्घकालीन आर्थिक धोरणांची दिशा निश्चित करणे गरजेचे आहे. योग्य नियोजन, विविधीकरण आणि स्वावलंबन यांचा समतोल साधल्यास भारत अशा बाह्य धक्क्यांना तोंड देईलच, पण अधिक सक्षम अर्थव्यवस्था म्हणून पुढेही येऊ शकतो. एव्हाना युद्ध मंदावले असले तरी देशातील औद्योगिक आणि व्यापारी वापराच्या गॅसपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. एलएनजीचा पुरवठा ३० टक्क्यांनी कमी झाला आहे. शिवाय मागण्या मान्य न झाल्याने युद्धाने पुन्हा उचल खाल्ल्यास परिस्थिती पुन्हा बिघडू शकते. युद्ध सुरू झाले, तेव्हा देशांतर्गत एलपीजी उत्पादन २८ टक्के होते. ते वाढून आता ६० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. परंतु तेदेखील पुरेसे नाही. इराणने ज्या पाच देशांना होर्मुझची वाट मोकळी करून दिली आहे, त्यात भारताचा समावेश आहे. जगातील अशा युद्धजन्य परिस्थितीतही 'एसअँडपी ग्लोबल' या जगद्विख्यात पतमानांकन संस्थेने भारतीय अर्थव्यवस्था २०२६-२७ या आर्थिक वर्षात ७.१ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. पूर्वीच्या अंदाजात ०.४० टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे, हे लक्षणीय म्हणावे लागेल. याचा अर्थ चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत मार्च २०२७ अखेरीस संपणाऱ्या आर्थिक वर्षात अर्थगतीचा वेग फक्त अर्ध्या टक्क्याने घटेल, असा होरा व्यक्त करण्यात आला आहे. याउलट, अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण संघर्षामुळे आशिया पॅसिफिक देशांची विकासगती वर्षअखेरीपर्यंत ०.५ ते ०.७ टक्क्याने कमी होईल, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. म्हणजे भारताची स्थिती त्यातल्या त्यात बरीच म्हणायची. बॉम्बफेक, क्षेपणास्त्र आणि ड्रोनहल्ले यामुळे हवाई तसेच सागरी वाहतूक खोळंबून राहिली आहे. पुरवठा साखळी विस्कळित झाल्याने कच्चे तेल, पेट्रोल आणि डिझेल यांची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, असा 'एसअँडपी' या पतमानांकन संस्थेचा अंदाज आहे. इंधनाची सर्वाधिक आयात करणाऱ्या देशांमध्ये जपान आणि भारताचा समावेश होतो. त्यामुळे सध्याच्या ज्वलंत वास्तवाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काहीच परिणाम होणार नाही, असे म्हणता येणार नाही. परंतु इराणने झुकते माप दिल्याचा आपल्याला फायदा होणार आहे, हे नक्की. इंधन महागल्यास, त्याचा शेती, उत्पादनक्षेत्र व सेवाक्षेत्र या सगळ्यावर परिणाम होत असतो.

काही काळापूर्वी भारतातील चलनवाढ उणे स्थितीत होती. यंदा मात्र महागाई निर्देशांक ४.३ टक्क्यांवर राहील, अशी एकूण चिन्हे आहेत. सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या किमती वाढवल्या असल्या, तरी पेट्रोल आणि डिझेलचे दर स्थिर आहेत. औद्योगिक वापरासाठीच्या डिझेलच्या किमतीत मात्र प्रति लिटर २२ रुपयांची वाढ झाली आहे. युद्ध दीर्घकाळ सुरू राहिल्यास सरकारला इंधनाचे दर वाढवणे भाग पडेल. त्यानंतर मात्र महागाई आणखी वाढण्याची भीती आहे. सेवाक्षेत्राच्या उत्तम कामगिरीमुळे चालू खात्यातील तूट सध्या आटोक्यात आहे. रिझर्व्ह बँक कर्जावरील व्याजदर 'जैसे थे' ठेवेल, परंतु २०२६-२७ च्या दुसऱ्या सहामाहीमध्ये व्याजदर पाव टक्क्याने वाढण्याची शक्यता असल्याचे भाकित एसअँडपीने केले आहे. व्याजदर वाढतात, तेव्हा उत्पादनखर्च वाढतो आणि वस्तूंचे दर वाढवून, शेवटी ग्राहकाकडूनच हा खर्च वसूल केला जात असतो. प्रमुख जागतिक चलनांच्या तुलनेत अमेरिकी डॉलर कमकुवत बनल्याने आणि खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमती नरमल्याने रुपयाला मजबुती साधता आली. परंतु गेल्या महिन्याभरात रुपयाची जवळपास चार टक्क्यांनी घसरण झाली होती. कारण परकीय पोर्टफोलिओ गुंतवणूकदार भारतीय बाजारातून माघार घेत असून त्याचा रुपयावर ताण आला होता. आर्थिक अनिश्चिततेच्या काळात सुरक्षित आधार म्हणून सोन्याची मागणीही वाढली आहे. शिवाय जगभरातील मध्यवर्ती बँकांनी त्यांच्या गंगाजळीचे मूल्य टिकवून ठेवण्यासाठी गेल्या काही वर्षांमध्ये सोन्याची भरपूर खरेदी सुरू ठेवली आहे. तसेच जागतिक तणाव वाढतो, तेव्हा सोन्याला असलेली मागणी वाढत असते, हा इतिहास आहे. आर्थिक विश्लेषकांनी सकारात्मक अंदाज व्यक्त केला असला, तरीदेखील कठोर वास्तवाकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही. मध्यपूर्वेतील तणावामुळे त्या भागात राहणाऱ्या भारतीयांकडून भारतात येणाऱ्या रकमांवर परिणाम होऊ शकतो. मध्यपूर्वेत एक कोटी भारतीय राहतात आणि देशाच्या एकूण व्यवस्थेच्या साडेतीन टक्के इतका निधी त्यांच्याकून येतो. भारत हा जगातील सर्वाधिक रेमिटन्स मिळवणारा देश आहे. या निधीमुळे भारताच्या एक्सटर्नल अकाउंटला मोठा आर्थिक आधार मिळतो. युद्धामुळे भारताकडून मध्यपूर्वेकडे जाणाऱ्या जवळपास १२ अब्ज डॉलरच्या कृषिनिर्यातीलाही झळ पोहोचली आहे. गेल्या वर्षी भारतातून मध्यपूर्वेतील देशांना ४.४३ अब्ज डॉलर किमतीचा तांदूळ धाडण्यात आला होता. युद्धामुळे चार लाख टन बासमती तांदूळ बंदरात किंवा वाहतुकीत अडकून राहिले आहेत. भारत इराणला तांदूळ, चहा, औषधे धाडतो. असा ७६ हजार टन माल खोळंबून राहिला आहे. वाहनांचे घटक आणि सुटे भाग यांच्या निर्यातीतही घट झाली असून विमा कंपन्यांनी दर वाढवल्यामुळे निर्यातदारांची स्पर्धात्मकता कमी होत आहे. 'एचएसबीसी' या संस्थेच्या ताज्या सर्वेक्षणानुसार खासगी क्षेत्राची वाढ मार्च महिन्यात सर्वाधिक गतीने मंदावली आहे. त्यातही उत्पादनक्षेत्र हे नीचांकी पातळीवर गेले आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता, केंद्र सरकारला राज्यांच्या सहकार्याने आर्थिक प्रतिकूलतेवर मात करावी लागेल. त्यासाठी व्यापारी, उद्योजक, आयातदार व निर्यातदार यांना आर्थिक आधार द्यावा लागेल. केंद्र सरकारप्रमाणेच राज्यांनाही आर्थिक उधळपट्टीला तसेच सवंग योजनांना कात्री लावावी लागेल. आजच्या परिस्थितीमध्ये निर्यात बाजारपेठा विस्तारून आखाती प्रदेशावरचे अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे. आर्थिक धोरणात स्थैर्य राखत परकीय गुंतवणूक आकर्षित करणे आणि रुपया बळकट ठेवणे हेही तितकेच महत्त्वाचे ठरते. या संकटाकडे केवळ तात्पुरत्या अडचणी म्हणून पाहणे पुरेसे नाही, तर त्यातून दीर्घकालीन आर्थिक धोरणांची दिशा निश्चित करणे गरजेचे आहे. योग्य नियोजन, विविधीकरण आणि स्वावलंबन यांचा समतोल साधला तरच भारत अशा बाह्य धक्क्यांना तोंडच देईल.

# स्त्रीशक्तीची त्रिवेणी

**विशेष**

**– डॉ प्रीती पोहेकर**


येसूवहिनी


माई


ताई

अवघ्या आयुष्यात प्रत्ययकारी, कडवट संघर्ष येसूवहिनी, माई आणि ताई या सावरकर घराणातल्या तीन स्त्रियांनी केला. दारिद्र्य, कटू बोल सहन केले. या त्रिवेणीच्या जीवनावर आधारित एक नाटिका मी आणि सहकारी सादर करतो. या प्रवासात अनुभवायला मिळालेले महिलाशक्तीचे अदभूत रुप आजघडीला नक्कीच औचित्यपूर्ण ठरण्याजोगे आहे.

प्रत्येक वेळी आपण महिला दिन साजरा करतो, तेव्हा आपल्यासमोर काही ठराविक नावे येतात. मोठ्या पदांवर काम करत असलेल्या किंवा प्रकाशझोतात राहिलेल्या आजच्या स्त्रिया किंवा इतिहासाच्या पानांवर ठळक अक्षरांनी लिहिलेल्या 'कालच्या' स्त्रिया. मात्र त्या पानांच्या कडेला, सावलीत उभ्या असलेल्या काही स्त्रिया मात्र अजूनही दुर्लक्षित राहतात. येसूवहिनी म्हणजे बाबाराव सावरकरांच्या पत्नी, माई म्हणजे तात्याराव सावरकरांच्या पत्नी आणि ताई म्हणजे नारायणराव सावरकरांच्या पत्नी. या सावरकर कुटुंबातील 'तिघी'अशाच सावलीत राहिलेल्या, पण प्रखर तेज असलेल्या स्त्रिया. त्यांचा अबोल त्याग सदैव झाकोळलेलाच राहिला. खरे तर, महापुरुषांच्या मागे उभ्या असलेल्या स्त्रियांच्या वेदनांची समाजाला फारशी जाणीव नाही. त्यांचे नाव मोठ्या अक्षरांमध्ये लिहिले जात नाही. त्यांचे उल्लेखही केले जात नाहीत. मग त्या कस्तुरबा गांधी असोत, कमला नेहरू असोत किंवा स्वातंत्र्ययुद्धात उल्लेखही न झालेल्या इतर अनेक अज्ञात समिधा असोत. खरे तर, इतिहासाच्या पानांवर ठळकपणे दिसणाऱ्या श्रेष्ठ नावांमागे हेच आधारस्तंभ खंबीरपणे उभे असतात. सावरकरांच्या कणखर व्यक्तिमत्त्वामागे या तिघींचा मोठा वाटा होता.

आपण स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल बोलतो, तेव्हा त्यांनी सोसलेली १४ वर्षांची अंदमानातील काळ्या पाण्याची शिक्षा, त्यांचे लेखन, त्रिखंडात गाजलेली त्याची मार्सेलिसची उडी, त्यांचा धाडसी स्वभाव यांचा उल्लेख होतो. बाबाराव सावरकर आणि नारायणराव सावरकर यांचे योगदानही अधोरेखित होते. पण या तिघांच्या मागे उभ्या असलेल्या त्यांच्या पत्नींच्या आयुष्याचा विचार आपण कितीदा करतो? स्वातंत्र्यलढा म्हणजे केवळ हातात बंदूक घेणे किंवा तुरुंगात जाणे नव्हे. कधी कधी तो लढा आपल्या रोजच्या जीवनशैलीत बदल घडवून आणण्याचा संघर्ष असतो. येसूवहिनींनी हे दाखवून दिले. त्यांनी स्त्रियांना घराच्या चौकटीबाहेरचा विचार करायला शिकवले. पती अंदमानात शिक्षा भोगत असताना, घरची परिस्थिती बिकट असताना, समाजाचा बहिष्कार असताना त्यांनी खचून न जाता काम सुरू ठेवले. आजच्या भाषेत सांगायचे तर त्या 'ग्रासरूट लीडर' होत्या. येसूवहिनींनी नाशिकमध्ये 'आत्मनिष्ठ युवती संघ' स्थापन केला होता. हा फक्त महिलांचा संघ नव्हता, तर एक विचार होता. स्वाभिमानाचा, स्वदेशीचा आणि संघटित स्त्रीशक्तीचा. परदेशी मालाची होळी, स्वदेशीचा आग्रह, ब्रिटीश सत्तेला अस्वस्थ करणारे सूक्ष्म पण प्रभावी विरोध ही सारी कृत्ये येसूवहिनी अंमलात आणत होत्या.

तात्याराव सावरकरांच्या पत्नी म्हणजे माई अत्यंत श्रीमंत घरातून आल्या होत्या. विवाहानंतर मात्र त्यांना जे जीवन मिळाले, ते अठरा विश्वे दारिद्र्याचे होते. परंतु आपले वैभव माहेरीच सोडून त्यांनी सावरकरांच्या घरात प्रवेश केला. देशाप्रति आयुष्य अर्पण करणारा पती, पतीवर चालणारे खटले, तुरुंगवास, समाजाची वाळीत टाकण्याची वृत्ती याविषयी त्यांनी एकदाही तक्रार केली नाही. त्यांनी कधीही पतीच्या कार्यात अडथळा आणला नाही. उलट, मनापासून साथ दिली. हे त्यांचे आंधळे समर्पण नव्हते. त्यांनी ते जाणीवपूर्वक हाती घेतलेले व्रत होते. त्यांनी आपला स्वाभिमान जपला. घर सांभाळले. संकटांना तोंड दिले आणि पतीने उचललेला देशसेवेचा वसा सहज स्वीकारला. आज 'मी माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेर जाणार नाही' असे सहज म्हणता येते. पण त्या काळात माईंनी संपूर्ण आयुष्यच कम्फर्ट झोनशिवाय व्यतीत केले. नारायणराव सावरकरांच्या पत्नी शांताबाई म्हणजे ताई. या घरातले दोन्ही थोरले भाऊ अंदमानात शिक्षा भोगत आहेत. घरची परिस्थिती हलाखीची आहे. समाजाने त्यांना वाळीत टाकले आहे, हे सारे माहीत असूनही त्यांनी या घरात लग्न करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय भावनिक नव्हता. तो धाडसी होता. ते जाणून बुजून आगीत उडी घेणे होते. पण त्यांनी तो संघर्षमार्ग निवडला आणि निभावला. महात्मा गांधींच्या हत्येनंतर सरकारने सावरकरांवर संशय घेतला. तेव्हा पुन्हा एकदा या कुटुंबावर संकट कोसळले. घरावर दगडफेक, समाजाचा रोष, चौकशा आणि हल्ले या सगळ्यात या स्त्रिया पुन्हा उभ्या राहिल्या. स्वराज्यातही या कुटुंबाने वनवास भोगला. त्या वनवासात ताईंनी सारे घर सावरले. त्यांचा ठामपणा आणि निर्णयशक्ती या प्रसंगात अधिक ठळकपणे दिसली.

आज आपण महिला दिन साजरा करतो. 'एम्पॉवरमेंट', 'इंडिपेन्डन्स', 'सेल्फ-लव्ह' या शब्दांवर चर्चा करतो. सोशल मीडियावर पोस्ट, शुभेच्छा, कार्यक्रम करतो. पण एम्पॉवरमेंट म्हणजे नेमके काय, तर सतत लढत राहणाऱ्या या तिघी आजच्या युवतींना त्यांच्या जगण्यातून आणि वर्तनातून काही स्पष्ट संदेश देतात. त्या सांगतात, की संघर्ष म्हणजे फक्त रणांगण नाही. आज अनेक मुली लहान-सहान कारणांनी डिप्रेशनमध्ये जातात. नात्यांबद्दल तक्रारी करतात. वेळ न दिल्याची खंत व्यक्त करतात. भावना महत्त्वाच्या आहेतच, पण या स्त्रियांनी वर्षानुवर्षे पतीचा सहवास न मिळता संसार केला. त्यांनी कधीच त्या अभावाचे भांडवल केले नाही. त्यांनी जे सोसले, ते एक व्रत मानून स्वीकारले. त्यातूनच त्यांना मानसिक बळ मिळाले. या त्यागमूर्ती आपल्याला संदेश देतात की स्त्रियांनी समर्पण आणि स्वत्व यांचा समतोल सांभाळायला हवा. या 'तिघी' स्वतःला पूर्णपणे विसरून गेलेल्या नव्हत्या. त्यांनी कुटुंब जपले आणि आत्मसन्मानही जपला. त्यांनी समाजकारण केले. स्त्रियांना संघटित केले. निर्णय घेतले. स्वत:बरोबरच अनेक स्त्रियांना आत्मसन्मान मिळवून दिला. जगण्याचे ध्येय मिळवून दिले. समर्पण म्हणजे आत्मविस्मृती नव्हे आणि स्वातंत्र्य म्हणजे जबाबदाऱ्यांपासून पळ काढणे नव्हे, हे आजच्या स्त्रीनेही हे लक्षात घ्यायला हवे. महापुरुषांच्या मागे उभ्या असलेल्या स्त्रियांचा त्याग समाज फारसा ओळखत नाही. पण त्यामुळे त्यांच्या कार्याचे महत्व कमी होत नाही. आजही अनेक स्त्रिया घर, नोकरी, मुलं, समाजकार्य या सगळ्यांचा समतोल साधत असतात. त्यांना कदाचित पुरस्कार मिळणार नाहीत. पण त्यांचे कार्य तितकेच मोठे असते.

अर्थात आजचा संघर्ष वेगळा आहे. करिअर, स्पर्धा, सोशल मीडिया, मानसिक आरोग्य, नातेसंबंध यांचे ताण आहेत. पण आज साधनेही आहेत. शिक्षण, कायदे, कुटुंबाचा पाठिंबा, संवादाची माध्यमे उपलब्ध आहेत. त्यामुळे माघार घेऊ नका. अन्याय सहन करू नका, पण इतरांवर अन्यायही करू नका. स्वतःला सिद्ध करा. स्त्रीशक्ती म्हणजे सहनशीलता आहे. स्त्रीशक्ती म्हणजे निर्णयक्षमता आहे. स्त्रीशक्ती म्हणजे ध्येयनिष्ठा आहे. येसुवहिनी, माई आणि ताई या तिघींकडे पाहिले की 'स्वत्व जपणारी स्त्री' ही स्त्रीशक्तीची व्याख्या समोर येते. त्यांनी पतीचा सन्मान केला, पण स्वतःची ओळखही जपली. त्यांनी दुःख झेलले, पण कटुता ठेवली नाही. समाजाचा रोष सहन केला, पण ध्येय सोडले नाही. ८ मार्चच्या दिवशी त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ इतिहास आठवणे नव्हे. तो एक आरसा आहे. आपण आज कुठे आहोत, आपण किती सक्षम आहोत, आपण किती सहज खचतो याचा विचार करण्याचा हा दिवस आहे. त्या सांगतात, 'मुलींनो, स्वप्ने बाळगा. उंच आकाशात उडा. उत्तम करिअर करा. स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवा. पण त्याच वेळी मानसिक ताकदही वाढवा. नात्यांची किंमत ओळखा. कुटुंब, समाज आणि स्वतः यांचा समतोल साधा. कारण खरी सशक्त आणि सक्षम स्त्री तीच, जी स्वतःला सिद्ध करते, पण आपली मुळे विसरत नाही.' त्यामुळे आजचा दिवस हा केवळ सेलिब्रेशनचा दिवस नाही. चिंतनाचा आहे. आपण त्या स्त्रियांसारखे संकटातही ठाम राहू शकतो का, स्वत्व जपत समर्पण करू शकतो का? आपण तक्रारींपेक्षा कृतीची निवड करू शकतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधायला आपण तयार झालो, तरच महिला दिनाचा खरा अर्थ उमगेल.

येसुवहिनी, माई आणि ताई या त्रिवेणीने आपल्याला शिकवले की स्त्रीशक्तीचा खरा अर्थ गाजावाजा करण्यात नाही, तर शांत पण अढळपणे उभे राहण्यात आहे. म्हणूनच ८ मार्चच्या महिला सक्षमीकरणाच्या दिवशी त्यांच्या स्मृतीला वंदन करताना आपण फक्त टाळ्या वाजवू नयेत, तर त्यांच्या धैर्याचा एक अंश तरी आपल्या आयुष्यात उतरवण्याचा संकल्प करावा.

**(शब्दांकन मेधा इनामदार)**

पान ३ वरून

## राष्ट्रहित हेच सर्वोच्च

परंतु काही लोकांसाठी पक्षहीत हेच सर्वस्व आहे. पक्षहीत हे देशहितापेक्षा मोठे असेल तर नारी शक्ती, देशाला याचे नुकसान सहन करावे लागते. यावेळीदेखील असेच झाले. काँग्रेस, डीएमके, टीएमसी, समाजवादी तसेच अन्य पक्षांच्या स्वार्थी राजकारणामुळे देशातील महिलांना नुकसान सोसावे लागत आहे, असे मोदी म्हणाले.

काल देशातील करोडो महिलांची नजर संसदेवर होती. देशातील महिला पाहात होत्या. मलाही खूप दुःख झाले. महिलांच्या हितासाठीचा हा प्रस्ताव मंजूर न झाल्यानंतर काँग्रेस, डीएमके, टीएमसे, सपा यासारखे पक्ष आनंदाने टाळ्या वाजवत होते. महिलाकडून त्यांचे अधिकार हिसकावून घेऊन टाळ्या वाजवत होते. या पक्षांनी जे केले ते महिलांच्या सन्मानावर आघात आहे.

महिला सगळं विसरतात परंतु त्यांचा अपमान कधीच विसरत नाहीत. म्हणूनच काँग्रेस तसेच इतर पक्षांची भूमिका प्रत्येक महिलेच्या मनात कायम राहणार आहे. देशातील महिला जेव्हा-जेव्हा या नेत्यांना पाहतील तेव्हा-तेव्हा महिलांना हे नेते आठवतील, असे म्हणत मोदी यांनी विरोधकांवर सडकून टीका केली.

पंतप्रधानांनी म्हणाले की, या महिलांना देशाची सेवा करण्याची इच्छा आहे. तरीही, घराणेशाही मानणाऱ्यांना मात्र असुरक्षिततेची तीव्र भावना सतावत आहे. परिसीमनामुळे महिलांचा दर्जा उंचावला जाणार होता, म्हणूनच त्यांनी या विधेयकाला विरोध केला. देशाची नारी शक्ती काँग्रेसला आणि त्यांच्या मित्रपक्षांना त्यांच्या या दुष्कृत्याबद्दल कदापि क्षमा करणार नाही.

काँग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष परिसीमनाबाबत सातत्याने असत्य माहिती पसरवत आहेत. या निमित्ताने, ते समाजात फूट पाडणाऱ्या द्वेषाच्या आगीला खतपाणी घालण्याचा प्रयत्न करत आहेत. फोडा आणि राज्य करा या प्रकारच्या राजकारणाचा वारसा त्यांना ब्रिटिशांकडून मिळाला आहे.

पंतप्रधान पुढे म्हणाले की, देशामध्ये दुफळी निर्माण करणाऱ्या भावनांना काँग्रेसने नेहमीच खतपाणी घातले आहे. परिसीमनाच्या मुद्द्यावर, काही राज्यांचे नुकसान होईल, असा दावा करत त्यांनी खोटा प्रचार केला. आम्ही हे स्पष्ट केले होते की, कोणत्याही राज्याचे प्रतिनिधित्व कमी केले जाणार नाही. तरीही, काँग्रेस, द्रमुक आणि तृणमूल काँग्रेस यांसारखे पक्ष ही वस्तुस्थिती स्वीकारण्यास तयार नव्हते.

## वांबोरी दुष्काळमुक्त करण्यासाठी सरकार कटिबद्ध

काम अक्षय कर्डिले करतील, असे सांगत त्यांनी सर्वांना त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

या सभेला आ. काशिनाथ दाते, उमेदवार अक्षय कर्डिले, ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, प्रशांत गायकवाड, वसंत चेडे, विनायक देशमुख, ॲड. तात्यासाहेब डोळसे, शिवाजी सागर, प्रा. शामराव पठारे, उदयसिंह पाटील, दत्तात्रय गडाख यासह आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. काशिनाथ दाते म्हणाले की, स्व. शिवाजीराव कर्डिले हे जनतेमध्ये राहून काम करणारे नेतृत्व होते. त्यांनी स्वतःची काळजी न करता जनतेची सेवा केली. नगर तालुक्यावर त्यांची मजबूत पकड होती आणि जनतेशी थेट नाळ जोडली गेली होती. मी आमदार होण्यात नगर तालुक्याचा मोठा वाटा असून त्याचे श्रेय स्व. शिवाजीराव कर्डिले यांना जाते. वांबोरी गावाशी आमचे स्नेह संबंध असून येथील मतदार अक्षय कर्डिले यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करतील.

अक्षय कर्डिले यांनी आपल्या भाषणात मतदारांना भावनिक साद घालत सांगितले की, माझ्या वडिलांचे अपूर्ण राहिलेले विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला मतरूपी आशीर्वाद द्या. मी जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी प्रामाणिकपणे काम करेन.

यावेळी ज्येष्ठ नेते सुभाष पाटील यांनीही मनोगत व्यक्त करत कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. सभेदरम्यान कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. गावागावातील बूथ प्रमुखांनी प्रचार अधिक तीव्र करण्याचा निर्धार केला.

## कळमकरांचा शोध अजूनही अधांतरी

न्यायालयाने ही कारवाई केली आहे. अभिषेक कळमकर याने पुणे जिल्ह्यातील एका महिलेला नोकरीचे आमिष दाखवून तिच्या इच्छेविरूध्द वारंवार जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले. घटनेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच महिला व तिच्या मुलीला जीवे मारण्याची धमकीही दिल्याचा आरोप आहे. यावरून पीडितेच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. दरम्यान, सदरचा गुन्हा दाखल झाल्यापासून अभिषेक पसार झाला आहे. त्याच दरम्यान आणखी एका तरूणीने अभिषेकवर गंभीर आरोप करत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नोकरीचे आमिष दाखवून तिच्यावर देखील अत्याचार करण्यात आला असल्याचा पीडितेचा आरोप आहे. त्यानुसार अभिषेक विरोधात अत्याचाराचा दुसरा गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, अभिषेक याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये पथके पाठवूनही तो मिळून आला नाही. यामुळे त्याच्याविरूध्द स्टँडिंग वॉरंट काढण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही तो हाती न लागल्याने पोलिसांनी न्यायालयाकडे पुढील कारवाईसाठी प्रस्ताव सादर केला.

यानंतर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी संशयित आरोपीस तात्काळ न्यायालयात हजर राहण्याचा आदेश देत सार्वजनिक ठिकाणी जाहिरनामा प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले आहेत. पोलीस प्रशासनाने संबंधित संशयित आरोपीस तातडीने न्यायालयात हजर राहण्याचे आवाहन केले असून, नागरिकांनीही या प्रकरणाबाबत माहिती मिळाल्यास पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पान ३ वरून

## अपराधसिद्धीला प्राधान्य द्या

सूत्रांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांनी यावेळी नाशिकच्या आयटी कंपनीतील धर्मांतराच्या घटनेचीही गंभीर दखल घेतली. राज्यात धर्मांतरासारखे प्रकार अजिबात खपवून घेऊ नका. नाशिक पोलिसांनी स्वतःहून हे प्रकरण उजेडात आणले. त्यांचे अभिनंदन. पण आता तेवढाच दमदार तपासही झाला पाहिजे. या प्रकरणातील सर्वच पॅटर्नचा तपास करा. कोणताही अँगल तपासून सूटू देऊ नका, असे ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी गोरेगाव ड्रग्ज प्रकरण व परतवाडा प्रकरणावरही भाष्य करत पोलिसांना संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. पोलिसांनी ड्रग्जविरोधात मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू करावी. तरुणाच्या भविष्याशी निगडीत ही बाब आहे. त्यामुळे अशी प्रकरणे गांभिर्याने घेतली पाहिजे. परतवाडा प्रकरणातील पीडितांचे समुपदेशन करून त्यांना तक्रार करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. त्यांना विश्वास दिले पाहिजे. या प्रकरणी संबंधित समाजसेवकांची मदत घेतली पाहिजे, असे ते पोलिसांना योग्य ते निर्देश देताना म्हणाले.

## पुलाच्या दुरुस्तीला हिरवा कंदील

यासाठी धुळे-मालेगाव-मनमाड-येवला मार्गे कोपरगाववरून अहिल्यानगरकडे जाणारी वाहतूक पुणतांबा फाट्यावरून याच मुंबई-नागपूर महामार्गावरून वैजापूर मार्गे वळविण्यात आली होती. त्यामुळे या महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुक वाढली होती. परंतु या महामार्गावरील संवत्सर येथील गोदावरी नदीवरील पुलावर पडलेल्या खड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे या पुलावरून सर्वच प्रकारची वाहतूक बंद करण्यात आल्यामुळे कोपरगाव वरून वैजापूर, छत्रपती संभाजीनगरला जाणाऱ्या नागरीकांसाठी मोठी अडचण निर्माण झाली होती.

या अडचणीची दखल घेवून आ. काळे यांनी केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री गडकरी यांची भेट घेऊन त्यांच्यापुढे वाहतूक बंद असल्यामुळे कोपरगाव-शिर्डी रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या मांडून संवत्सर पुलाची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेवून केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री गडकरी यांनी या पुलाच्या दुरुस्तीचे आदेश दिले होते.

त्या आदेशानुसार संवत्सर पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून दुरूस्तीच काम पूर्ण होताच हा पूल पुन्हा वाहतुकीसाठी खुला होवून या पुलावरून पूर्वीप्रमाणे होणारी वाहतूक पुन्हा सुरळीत होणार आहे. त्यामुळे असंख्य वाहनचालकांना व नागरिकांना होणारा मोठा त्रास दूर होणार असल्याचे आ. काळे यांनी म्हटले आहे. संवत्सरच्या पुलाचे दुरुस्तीचे काम सुरु झाल्यामुळे या महामार्गाने नियमितपणे ये-जा करणाऱ्या वाहन चालकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. तसेच हा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्यामुळे या मुंबई-नागपूर महामार्गाच्या लगत कोपरगाव तालुक्यातील अनेक गावातील छोट्या मोठ्या व्यावसायिकांचे व्यवसाय धोक्यात आले होते. परंतु संवत्सर पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरु झाल्यामुळे पुन्हा एकदा रहदारी सुरळीत होवून व्यवसाय पूर्वपदावर येणार आहेत. त्यामुळे कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील कोकमठाण, संवत्सर, दहेगाव बोलका, लौकी-गोधेगाव, तळेगाव, तसेच वैजापूर तालुक्यातीलही छोट्या-मोठ्या व्यावसायिकांनी आ. काळे यांचे आभार मानले आहे.

## स्व. जगतापांच्या स्मरणार्थ आज रामकथा

ऐकणे आणि अनुभवणे हा एक अद्भुत अनुभव नगरच्या भाविकांसाठी ठरणार आहे. माजी आमदार स्व. अरुण जगताप यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त होणाऱ्या या ऐतिहासिक रामकथा सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी व्हावे व तिन्ही दिवस महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन काका ट्रस्टचे अनिल मुरकुटे, अजित जगताप व अनुप काळे यांनी केले आहे.

## संगमनेरात सशस्त्र दरोडेखोरांचा धुमाकूळ

दहशतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काल, शनिवारी पहाटे १२:३० वाजेच्या सुमारास ७ ते ८ सशस्त्र दरोडेखोरांच्या टोळीने आपला मोर्चा उंबरी बाळापूर परिसराकडे वळवला. चोरट्यांनी प्रथम शेडगाव-उंबरी बाळापूर नवीन पुलालगत असलेल्या किसन खेमनर यांच्या हॉटेल बानाईला लक्ष्य केले. मात्र, तेथे रोख रक्कम किंवा मौल्यवान वस्तू हाती न लागल्याने चोरट्यांनी चक्क हॉटेलमधील खाद्यपदार्थांवर ताव मारला आणि तिथून काढता पाय घेतला. त्यानंतर या टोळीने जवळच असलेल्या भाऊसाहेब खेमनर यांच्या वस्तीवर धाड टाकली. चोरट्यांनी घरात शिरून सर्व सामानाची उचकापाचक केली. खेमनर कुटुंबाने दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी येथून अंदाजे २ तोळे सोने, २५ ते ३० हजार रुपयांची रोकड आणि एक मोबाईल चोरला. घराबाहेर आवाज झाल्याने हौशीराम खेमनर हे बाहेर आले असता, दरोडेखोरांनी त्यांच्यावर दगडफेक करत तिथून पळ काढला. रात्री दीड वाजेच्या सुमारास ही टोळी प्रवरा कालव्यालगत राहणाऱ्या चांगदेव उंबरकर यांच्या घरी पोहोचली. घराचा मागील दरवाजा तोडून ३ ते ४ दरोडेखोर आत शिरले. त्यांनी उंबरकर कुटुंबातील तरुणांच्या गळ्याला कुऱ्हाड आणि कती लावून जीवे मारण्याची धमकी दिली. उंबरकर यांच्या माहितीनुसार, चोरट्यांनी येथून १० ते १२ तोळे सोने आणि ३० हजारांची रोकड पळवली. अत्यंत क्रूरता दाखवत दरोडेखोरांनी घरातील वृद्ध महिलेच्या कानातील दागिने ओरबाडून काढले, ज्यामध्ये त्यांचे कान फाटून त्या रक्तबंबाळ झाल्या. यावेळी प्रतीक उंबरकर या तरुणाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, दरोडेखोरांनी त्याच्यावरही दगडफेक केली. उंबरी बाळापूरमधील घटनांनंतर चोरट्यांनी आश्वी बुद्रुक शिवारातील मच्छिंद्र होडगर यांच्या घरावर डल्ला मारला. येथे चोरट्यांनी ४ ते ५ तोळे सोने आणि १ लाख ७३ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. होडगर कुटुंबीय गाढ झोपेत असताना ही चोरी झाली असून, सकाळी उठल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या घटनेची माहिती मिळताच आश्वी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी ताफ्यासह घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक दीपक बर्डे, पोलीस हवालदार महेश आहेर यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. सकाळी श्वानपथकाला पाचारण करण्यात आले असून, पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. या घटनांचा पुढील तपास पोलीस करीत आहे.

# बोधेगावातील आरोग्यसेवा जागेअभावी अडचणीत

## स्वतंत्र जागा न दिल्यास आंदोलनाचा इशारा; ग्रामपंचायतीकडे निवेदन



### जागा उपलब्ध करून देण्यासाठी चर्चा करणार

बालकांच्या लसीकरणासाठी स्वतंत्र जागा असणे अत्यंत गरजेचे आहे. जागा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित गावच्या ग्रामविकास अधिकाऱ्यांसोबत चर्चा करणार आहोत.

**सोनल शाहा, गटविकास अधिकारी, शेवगाव**

### दीड महिन्यापासून समाज मंदिरात लसीकरण

बोधेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात लसीकरणासाठी जागा दिली जात नाही. त्यामुळे दीड महिन्यापासून समाज मंदिरात लसीकरण मोहीम राबवावी लागत आहे. जागेसाठी ग्रामपंचायतीकडे मागणी केली आहे.

**वर्षा राजपूत, आरोग्य सेविका, बोधेगाव**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : आरोग्यसेवा पुरवताना बोधेगाव (ता. शेवगाव) येथील आशा सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना जागेअभावी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून सध्या लसीकरणाचे सत्र चक्क समाज मंदिरात घेण्याची वेळ आली आहे. आवश्यक सोयीसुविधांचा अभाव असल्यामुळे बालकांचे लसीकरण, गर्भवती महिलांची तपासणी आणि इतर आरोग्य सेवा देताना अनेक अडथळे निर्माण होत आहेत.

बोधेगाव येथील ग्रामीण रुग्णालयाकडून लसीकरणासाठी जागा उपलब्ध करून दिली जात नसल्याने आशा सेविका आणि आरोग्य कर्मचारी तात्पुरत्या स्वरूपात मिळेल त्या जागेचा वापर करीत आहेत. गेल्या दीड महिन्यापासून स्थानिक नागरिकांच्या मदतीने समाज मंदिरात लसीकरण मोहीम राबवली जात आहे. मात्र, त्या ठिकाणी मूलभूत सुविधांचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. रुग्णांसोबत आलेल्या नागरिकांनाही बाहेर उभे राहावे लागत असल्याने गैरसोय वाढली आहे. लसीकरणासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून द्यावी, यासाठी आशा सेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांनी ग्रामपंचायतीकडे अनेकदा मागणी केली. मात्र, अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.

आरोग्य सेवा ही अत्यावश्यक बाब असल्याने किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, ग्रामपंचायत सदस्य महेश घोरतळे यांनी पुढाकार घेत हातगाव रोडवरील ग्रामपंचायत कार्यालयाची जुनी इमारत लसीकरणासाठी उपलब्ध करून द्यावी, यासाठी शुक्रवारी (दि. १७) निवेदन दिले. २० एप्रिलपर्यंत जागा उपलब्ध न केल्यास आंदोलनाचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर ग्रामपंचायत सदस्य महेश घोरतळे, प्रतीक पलाटे, किशोर काशिद, किशोर तांबे, शीला सोपान घोरतळे, सोनाली घोरतळे, तसेच आशा सेविका मुमताज शेख, वैशाली सोनेकर, कावेरी मिसाळ, अंजली उदगीरकर, सीमा घुगे, मीना महानोर, ए. एस. राठोड, व्ही. बी. घुशिंगे, ए. एस. गालफाडे आदींच्या सह्या आहेत.

# एसटी प्रवासात सोन्याचे दागिने लंपास

## पोलिसांच्या तांत्रिक तपासातून महिला आरोपी जेरबंद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासे** : एसटी बसमधील प्रवासादरम्यान वृद्ध महिलेच्या बॅगेतील सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या महिलेला कोतवाली पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे अटक केली असून चोरीचे दागिने बोधेगाव येथील सराफाकडे विकल्याचे तपासात उघड झाले आहे. तालुक्यातील सोनईजवळील करजगाव येथील मीनाबाई ज्ञानदेव बडाख या ७ एप्रिल रोजी पुणे येथील आरे मैदान परिसरातील वाकडेवाडी एसटी बसस्थानकातून करजगावकडे प्रवास करत होत्या.

त्यांची एसटी बस घोडनदी (ता. शिरूर) येथे आली असता तोंडाला स्कार्फ बांधलेल्या दोन अनोळखी महिला बसमध्ये चढल्या. त्यापैकी एक महिला मीनाबाई बडाख यांच्या शेजारी येऊन बसली. दरम्यान, बस केडगाव येथे पोहोचल्यानंतर मीनाबाई बडाख यांनी बॅग तपासली असता त्यातील सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे लक्षात आले. यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून कोतवाली पोलिसांनी तातडीने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी माया कल्याण भोसले या महिलेला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान तिने चोरी केल्याची कबुली दिली. तपासात पुढे उघड झाले की, चोरीतील सोन्याचे दागिने शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील सराफ भागवत मधुकर आदापुरे यांच्याकडे विक्री करण्यात आले होते. यानंतर पोलिसांनी आदापुरे यांना नोटीस बजावून कोतवाली पोलीस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश दिले. त्यानुसार ते पोलिसांसमोर हजर झाले असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणातील जलद कारवाईमुळे कोतवाली पोलिसांच्या तपास कौशल्याचे कौतुक होत आहे. दरम्यान, एसटी प्रवासादरम्यान नागरिकांनी मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# शास्त्र-शस्त्र-लेखणीची सांगड घालण्याची गरज : अनिल महाराज देवळेकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तिसगाव** : शिवछत्रपतींच्या शौर्यगाथा आणि इतिहास समाजापर्यंत कीर्तनाच्या माध्यमातून पोहोचवणे ही काळाची गरज असून शास्त्र, शस्त्र आणि लेखणी यांची सांगड घालूनच समाजात सकारात्मक क्रांती घडू शकते, असे प्रतिपादन शिवचरित्र अभ्यासक अनिल महाराज देवळेकर यांनी केले. ता. पाथर्डी येथील श्रीक्षेत्र मढी येथे आयोजित हिंदू जनजागृती सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच संजय मरकड होते. व्यासपीठावर अशोकनाथ पालवे, पोपट महाराज मढीकर, कालिदास घोडके, खंडूआबा सानप, बाबासाहेब मरकड, योगी सुंदरनाथ आदी मान्यवर उपस्थित होते.

देवळेकर महाराज म्हणाले की, देव, देश आणि धर्मकारण यांची व्याख्या समाजात कायम सजीव ठेवावी लागेल. श्रीराम यांच्या हाती धनुष्यबाण, भगवान श्रीकृष्ण यांच्या हाती सुदर्शन चक्र, तर छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी हाती तलवार घेऊन अन्यायाविरुद्ध लढा दिला. त्यामुळे दुष्ट प्रवृत्तींचा नाश झाला आणि धर्मरक्षण शक्य झाले. आज सर्वधर्म समभावाची हाक दिली जात असली, तरी त्याचबरोबर हिंदू संस्कृतीवर अतिक्रमणे वाढत असल्याची चिंता व्यक्त करत त्यांनी सांस्कृतिक जागृतीची गरज अधोरेखित केली. अठरा पुराणे, सहा शास्त्रे यांसोबतच लेखन आणि शस्त्रकलेचे ज्ञान समाजात प्रचलित करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमानंतर भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच संजय मरकड यांनी केले. यावेळी संकेत मरकड, रामकिसन मरकड, अर्जुन महाराज गाडेकर, साईनाथ मरकड, कानिफनाथ साळवे, मंदाबाई पाखरे, रंजनाबाई मरकड, आशाबाई मरकड, सविता मरकड, नंदाबाई मरकड, लताबाई मरकड, भाऊसाहेब निमसे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार भानुविलास मरकड यांनी मानले.

# पानोडीत दोन दिवसीय 'महादेव यात्रा'

**जनता आवाज वृत्तसेवा**



**संगमनेर** : तालुक्यातील शिर्डी विधानसभा मतदारसंघातील पानोडी येथे ग्रामदैवत शंकराचार्य जयंतीनिमित्त २१ व २२ एप्रिल रोजी दोन दिवसीय भव्य 'महादेव यात्रा' उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (दि. २१) सकाळी महादेव मंदिरात अभिषेक, भजन कार्यक्रम, सायंकाळी भव्य कावड मिरवणूक व आतषबाजी होणार आहे. रात्री ९ वाजता प्रसिद्ध रील स्टार व लोकनाट्य कलावंत पोर्णिमा पाटील कराडकर यांचा तमाशा रंगणार आहे. बुधवारी (दि. २२) सकाळी पारंपरिक हजेरी तर दुपारी ४ वाजता कुस्त्यांचा भव्य हंगामा आयोजित करण्यात आला आहे. यात्रेनिमित्त महादेव व हनुमान मंदिराची रंगरंगोटी सुरू असून गावात पाळणे, खाद्य स्टॉल्स व दुकाने उभारली जाणार आहेत. या धार्मिक-सांस्कृतिक उत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा समिती व ग्रामस्थांनी केले आहे.

# प्रशासनाचे दुर्लक्ष; बेलापूर-श्रीरामपूर रस्त्यावरील झाडांना ग्रामस्थांचे 'जीवदान'

## ग्रामपंचायत, स्वयंसेवी गटांकडून तिसऱ्यांदा पाणी; आंदोलनाचा इशारा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर** : बेलापूर-श्रीरामपूर रस्त्याच्या दुभाजकात लावलेली झाडे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वाळू लागल्याने ग्रामपंचायत व स्वयंसेवी गटांनी पुढाकार घेत झाडांना तिसऱ्यांदा पाणी देत 'जीवदान' दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्क्रियतेबद्दल ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

रस्त्याच्या चौपदरीकरणानंतर दुभाजकात व दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले होते. मात्र कडक उन्हाळ्यात पाणी न मिळाल्याने झाडे कोमेजू लागली. याबाबत वारंवार मागणी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल न घेतल्याने बेलापूर बु. ग्रामपंचायत, सत्यमेव जयते ग्रुप व वर्गणीदारांनी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला. संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष शरद नवले, बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे आणि देविदास देसाई यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.

ग्रामपंचायत टँकरसह खाजगी टँकरद्वारे पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली. वृक्षप्रेमी व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी श्रमदान करत झाडांची देखभाल केली. यापुढे झाडांच्या जोपासणीकडे दुर्लक्ष झाल्यास रास्तारोको आंदोलन छेडण्याचा इशारा वृक्षप्रेमींनी दिला आहे.

# अशोक महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवार दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरणसमारंभ संपन्न झाला.या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रमासाठी महाराष्ट्राची प्रसिद्ध नृत्यांगना मानसी पाटील पुणेकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी आमदार अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन भानुदास मुरकुटे उपस्थित होते.

तसेच अशोक कारखान्याचे माजी चेअरमन सुरेश गलांडे,अशोक सहकारी कारखान्याचे माजी व्हा.चेअरमन बाबासाहेब काळे, बाबासाहेब आदिक,हिम्मतराव धुमाळ,अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेचे सचिव सोपानराव राऊत,सहसचिव विरेश गलांडे,मुळा प्रवरा को.ऑप.वीज सोसायटी संचालक सिद्धार्थ मुरकुटे,अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्रीताई मुरकुटे,अशोक कारखान्याचे संचालक निरज मुरकुटे,कार्यकारी संचालक संतोष देवकर,काशिनाथ गोराणे, पुंजाहरी शिंदे,भाऊसाहेब उंडे,अमोल कोकणे,बाळासाहेब शिंदे, नारायण बडाख,सरपंच सविता देवकर,अशोक सह.सा. का.कामगार पतपेढी चेअरमन भाऊसाहेब दोंड,कृषी उत्पन्न बाजार समिती श्रीरामपूर संचालक मयुर पटारे,शिवसेना



शहर प्रमुख उमेश पवार,शिवसेना तालुका प्रमुख संतोष डहाळे,श्रीरामपूर तालुका विधानसभा प्रमुख बाळासाहेब दोंड,शिवसेना शेतकरी संघटना सदाशिव उंडे,सामाजिक कार्यकर्ते रमेश वारुळे,शाम पुरनाळे,डांगे मामा,तायडे सर,अशोक पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य अंजाबापू शिंदे,अशोक इंग्लिश मिडीयम स्कुलचे प्राचार्य संपत देसाई,अशोक कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य प्रसाद कोते, आयडीयल स्कूलचे प्राचार्य रईस शेख,उपसरपंच जगन्नाथ जाधव, आशिष दोंड,युवराज थोरात, सचिन राऊत, दिपक राऊत,हमीद शेख, जमील पणान,संतोष सावंत, अमोल गुडेकर,इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख अतिथी प्रसिद्ध नृत्यांगना मानसी पाटील पुणेकर यांच्या शुभहस्ते विविध क्षेत्रांत नावलौकीक मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन गुणगौरव करण्यात आला.त्यानंतर मानसी पुणेकर यांनी विद्यार्थ्यांसमोर आपली नृत्यकला सादर केली.कार्यकर्माचे अध्यक्ष माजी आमदार अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन भानुदास मुरकुटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले,आपल्या महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा 'सुवर्णक्षण'आपण सर्वजन साजरा करत आहोत.स्नेहसंमेलन म्हणजे फक्त गाणी,डान्स किंवा नाटक नाही,तर स्नेहसंमेलन म्हणजे अभ्यासाच्या पुस्तकांमधून बाहेर येऊन आपल्यातील सुप्त कलागुणांना ओळखण्याची संधी आहे.हे महाविद्यालय केवळ आपल्याला पदवी देत नाही,तर एक चांगला माणूस म्हणून घडवते. इथे शिकलेली शिस्त,टीमवर्क आणि मैत्री आयुष्यभर सोबत राहते. अभ्यासाबरोबर आपण आपले छंद जोपासले पाहिजेत. तसेच नियमित व्यायाम केल्याने शरीर सुदृढ राहते.

अभ्यास व्यायाम आणि खेळ हे तीन गुण विद्यार्थ्यांनी आत्मसाद करावेत असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.दिलीप खंडागळे यांनी केले.त तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. सुनील म्हकांळे यांनी उत्कृष्ट नियोजन केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य सुयोग थोरात, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापिका, कार्यालयीन अधिक्षक बाबासाहेब पटारे,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलाठी कार्यालयात ३० वर्षे बेकायदेशीर कारभार? मन्सूर पटेलविरुद्ध गुन्हा दाखल

## आ. खताळ यांच्या स्टिंगनंतर कारवाई; शासकीय कामात अडथळ्याचा आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर येथील तलाठी कार्यालयात गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ बेकायदेशीररीत्या कामकाज करत असल्याचा आरोप असलेल्या मन्सूर पटेल याच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आमदारांच्या स्टिंग ऑपरेशननंतर या प्रकरणाला वेग आला असून महसूल विभागातील कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### ३० वर्षांपासून सुरू होता कारभार

मन्सूर पटेल हा गेल्या सुमारे ३० वर्षांपासून संगमनेरच्या तलाठी कार्यालयात नागरिकांना विविध दाखले देण्याचे काम करत असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्याचा जावई देखील कार्यालयात काम करत असल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर महसूल विभागातील अनधिकृत कारभार उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शहरातील मेन रोडवरील तलाठी कार्यालयात काही जणांकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याची तक्रार एका महिलेने आमदार खताळ यांच्याकडे केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत आमदारांनी बुधवारी तलाठी कार्यालयात स्वतः जाऊन स्टिंग ऑपरेशन केले. यावेळी तलाठी आणि मंडळ अधिकारी अनुपस्थित असल्याचे आढळले. त्यांच्या जागी दोन खाजगी व्यक्ती कार्यालयीन कामकाज करत असल्याचे निदर्शनास आले. या प्रकारानंतर आमदारांनी महसूल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून संबंधितांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

मात्र, त्यानंतरही मन्सूर पटेल गुरुवारी पुन्हा कार्यालयात कामकाज करण्यासाठी आला. याबाबत जाब विचारण्यासाठी गेलेल्या कार्यकर्त्यांशी त्याचा वाद झाला. तसेच आमदारांविषयी अपशब्द वापरल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट पसरली होती. दरम्यान, तलाठी पांडुरंग भुरे यांनी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात मन्सूर पटेलविरुद्ध फिर्याद दिली. गुरुवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास पटेल यांनी शासकीय कामात अडथळा आणल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा क्रमांक ३२०/२०२६ नोंदवत भारतीय न्याय संहिता कलम १३२ व २२१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करीत आहेत. या प्रकरणामुळे महसूल विभागातील अनधिकृत कामकाजावर नियंत्रण ठेवण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# कोंभळीत महाराज समाधान शिबिर उत्साहात

## प्रशासनाची तत्परता; एकाच छताखाली दाखल्यांचे वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा या उद्देशाने आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर' अभियानाचा पहिला टप्पा कोंभळी येथील न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला. या शिबिरात विद्यार्थी, शेतकरी, युवक तसेच विशेष गरजा असलेल्या लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर, उपविभागीय अधिकारी कर्जत तसेच तहसीलदार कार्यालय कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने महसूल मंडळ कोंभळी यांच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, तहसीलदार रवी सतवन, नायब तहसीलदार ठोंबरे यांच्या संकल्पनेतून आणि मंडळ अधिकारी जेडगुले बी.के. यांच्या नियोजनातून कार्यक्रम पार पडला. ग्रामीण भागातील नागरिकांच्या शासकीय कामातील अडचणी दूर करून आवश्यक दाखले एकाच छताखाली उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक सुनील अर्जुन गोरखे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी यांनी शिबिराच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. अध्यक्षीय भाषणात तहसीलदार रवी सतवन यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत विद्यार्थी व ग्रामस्थांना आवश्यक कागदपत्रे विना त्रास उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. या शिबिरात कोंभळी, खांडवी आणि कौडाणे येथील लाभार्थ्यांना विविध दाखले, प्रमाणपत्रे तसेच अंगणवाडीमार्फत मातांना आवश्यक साहित्याचे वितरण करण्यात आले. विशेष गरजा असलेल्या बालकांनाही लाभ देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चांगदेव जायभाय यांनी केले.

आभार प्रभारी प्राचार्य सुनील गोरखे व मंडळ अधिकारी जेडगुले यांनी मानले. यावेळी नायब तहसीलदार जाधव, महिला व बालविकास अधिकारी रोहिदास शिंदे, प्राथमिक आरोग्य केंद्र कोंभळीचे डॉ. दळवी, ग्राम महसूल अधिकारी कोरे, गुजर, श्रीखिळे, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब गांगर्डे, माजी सरपंच पुंडलिक गांगर्डे, धनराज गांगर्डे, मोहन गांगर्डे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे गावातच विविध शासकीय दाखले मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. अशा प्रकारचे शिबिर इतर गावांतही राबवावे, अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब गांगर्डे यांनी व्यक्त केली.

# एसटीच्या भाडेवाढीनंतर 'युपीआय' कोलमडले

## एसटी प्रवासात डिजिटल खोळंबा; सुट्या पैशांच्या वादाने प्रवासी हैराण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : सर्वसामान्यांची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लालपरी अर्थात एसटी बसचा प्रवास सध्या प्रवाशांसाठी एका वेगळ्या अनुभवांची शिदोरी असणारा ठरू लागला आहे. राज्य परिवहन महामंडळाने एसटी बसच्या भाड्यात १७.५ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतल्यामुळे प्रवाशांना आता खिशाला अधिक कात्री लावावी लागत आहे. मात्र, एकीकडे प्रवास महाग झाला असताना दुसरीकडे महामंडळाची ऑनलाईन युपीआय पेमेंट सेवा अचानक ठप्प झाल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.

आजच्या डिजिटल युगात जवळपास ७० ते ८० टक्के प्रवासी तिकीट काढण्यासाठी फोन-पे किंवा गुगल-पे सारख्या ऑनलाईन सेवांचा वापर करतात, परंतु ऐन वेळी ही सेवा बंद पडल्याने प्रवाशांना मोठा आर्थिक आणि मानसिक फटका बसत आहे.




गेल्या काही वर्षांत डिजिटल पेमेंटची सवय झाल्यामुळे अनेक प्रवाशांच्या खिशात पुरेशी रोख रक्कम नसते. अशा परिस्थितीत प्रवासादरम्यान युपीआय सेवा चालत नसल्याने विद्यार्थी वर्ग आणि महिला प्रवासी, नागरिक यांची मोठी तारांबळ उडत आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांनाही सुट्या पैशांसाठी कसरत करावी लागत आहे.

सध्या सर्वच ठिकाणी सुट्या पैशांचा मोठा तुटवडा जाणवत असून, अगदी भाजीमंडईपासून ते मोठ्या बाजारापर्यंत ऑनलाईन व्यवहार सुरू असल्याने नागरिक रोख पैसे सोबत ठेवण्याकडे दुर्लक्ष करतात. मात्र, एसटीमध्ये ही सेवा बंद असल्याने वाहक आणि प्रवाशांमध्ये सुट्या पैशांवरून खटके उडत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे प्रवासाचा आनंद पूर्णपणे निघून गेला असून कधी कधी वादा वादीचे प्रकार होत आहे.

भाडेवाढ करूनही जर मूलभूत डिजिटल सुविधा मिळत नसतील तर प्रवाशांनी ही अडचण कशी दूर करावी अशी विचारणा होत आहे. ही तांत्रिक अडचण तातडीने दूर करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता सर्वसामान्य प्रवासी वर्गातून केली जात आहे.

### एसटीतील युपीआय सेवा ठप्प

ऑनलाईन युपीआय सेवा ठप्प झाल्यामुळे प्रवाशांना केवळ तिकीट काढणेच कठीण झाले नसून, संपूर्ण प्रवासात कुठे पैसे देण्याचा आणि ऑनलाईन पेमेंट बाबत हा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्य परिवहन महामंडळ ही सुविधा पुन्हा कधी सुरू करणार आणि सर्वसामान्य प्रवाशांची या त्रासातून कधी सुटका होणार, असा प्रश्न आता जनता विचारत आहे.

# टाकळीभानमध्ये आज सैलानीबाबांचा उत्सव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी आज, दि. १९ एप्रिल रोजी टाकळीभानच्या सैलानीबाबा दर्ग्याचा संदल व न्याज भंडाऱ्याचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.



टाकळीभान येथील हायस्कुल शाळेच्या पाठिमागे सैलानी बाबा दर्गा असून तेथे दरवर्षी संदलचा कार्यक्रम गोडन्याज प्रसाद केला जातो आणि सायंकाळी बाबांना मानाची चादर सैलानी बाबा यांना सर्व ग्रामस्थ व भक्त मंडळाकडून अर्पण केली जाते.

भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन दर्गाचे पुजारी फिरोजभाई शेख, बाबा सय्यद, राजु बोडखे, नदिम शेख, कृष्णा जाधव, अलिफ शेख, हनिफ शेख, नवाज शेख, मुसा सय्यद, दशरथ अवसरमोल, आप्पासाहेब रणनवरे, मोबिन शेख, किशोर नवले, लक्ष्मण रणनवरे, तन्वीर शेख, अमरनाथ पवार, रवी रणनवरे, मल्हार रणनवरे, पांडु गांगुर्डे यांनी केले आहे.

# त्रिमूर्ती इंटरनॅशनल (सीबीएसई) स्कूलचा दैदिप्यमान निकाल

## वंजारी प्रथम तर शेंडकर व सोनवणे संयुक्तरीत्या द्वितीय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा फाटा** : माध्यमिक सीबीएसई परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचालित त्रिमूर्ती इंटरनॅशनल (सीबीएस्सी) स्कूलने यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत शैक्षणिक गुणवत्तेचा उच्चांक गाठला आहे.

विद्यालयाच्या एसएससी परीक्षेत आरोही वंजारी हिने प्रथम क्रमांक पटकावून यश संपादन केले. पूर्वा शेंडकर व ऋषिकेश सोनवणे यांनी संयुक्तरीत्या द्वितीय क्रमांक मिळविला, तर आरुष चव्हाण, भाग्यलक्ष्मी भोयर आणि शांभवी रोकडे यांनी तृतीय क्रमांक मिळवत विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. यंदा विद्यालयातून एकूण ५९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश मिळविले असून बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उत्तम गुणांसह यश संपादन केले आहे. या यशामुळे परिसरात विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा अ‍ॅड. सुमती साहेबराव घाडगेपाटील, उपाध्यक्ष अ‍ॅड. स्नेहल चेतन चव्हाणपाटील, सहसचिव डॉ. श्रुती गौरव आमलेपाटील, सचिव मनीष घाडगेपाटील तसेच प्राचार्य श्रीदेवी सी. के. यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे व विषय शिक्षकांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षण, नियोजनबद्ध अध्यापन व शिक्षकांच्या मेहनतीमुळे हा उल्लेखनीय निकाल लागल्याची भावना पालकांनी व्यक्त केली असून विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# मुठेवाडगावात दूषित पाण्याचा पुरवठा

## ग्रामस्थांच्या आरोग्याशी खेळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : मुठेवाडगाव येथे ग्रामपंचायतीमार्फत केला जाणारा पाणीपुरवठा सध्या अत्यंत दूषित स्वरूपाचा होत असल्याने ग्रामस्थांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे.

ग्रामपंचायतीकडून पाण्याचा पुरवठा हा पाण्याच्या टाकीद्वारे केला जातो. मात्र या टाकीचे व्हॉल्व्ह गळके असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत आहे. या गळतीमुळे टाकीजवळ साचलेले पाणी गटार स्वरूप धारण करते. पाणीपुरवठा बंद झाल्यानंतर हेच दूषित पाणी परत व्हॉल्व्हमधून सायफनमध्ये जाऊन पुन्हा नळाद्वारे ग्रामस्थांना पिण्यासाठी पुरवले जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.



यामुळे गावातील अनेक नागरिक तसेच लहान मुलांमध्ये उलट्या-जुलाबाच्या तक्रारी वाढल्या असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामस्थांनी याबाबत अनेक वेळा ग्रामपंचायतीकडे तक्रारी केल्या, मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

दरम्यान, प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून गळके व्हॉल्व्ह दुरुस्त करावेत, पाणीटाकीची स्वच्छता करावी आणि गावाला शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# संघर्षातून उभा राहिलेला कलाकार

## भानुदास बैरागींसोबत विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी संवाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**चांदेकसारे** : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धारणगाव येथे नुकताच एक अभिनव व प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. गल्ली ते दिल्ली, या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात कोपरगावचे सुपुत्र व सुप्रसिद्ध भारूडकार भानुदास बैरागी यांची विद्यार्थ्यांनी घेतलेली मुलाखत विशेष आकर्षण ठरली. यावेळी गावच्या नवनिर्वाचित उपसरपंच कविता संतोष चौधरी यांचा शाळेच्या वतीने स्नेहपूर्वक सत्कार करण्यात आला.




मुलाखतीदरम्यान भानुदास बैरागी यांनी आपल्या संघर्षमय जीवनप्रवासाचे प्रभावी वर्णन केले. जिल्हा परिषद शाळा कोल्हे वस्ती येथून प्राथमिक शिक्षण घेतलेल्या बैरागी यांनी आयुष्यातील अपयशावर मात करत जिद्दीने पुढे कसे वाटचाल केली, याचा अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडला. शेतमजुरीपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज बँकेतील शाखा व्यवस्थापक पदापर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमातील विशेष बाब म्हणजे विद्यार्थ्यांनी विचारलेले विविध प्रश्न. साई विघ्ने, चैताली पाठक, लक्ष्मी जाधव, कार्तिकी थोरात, वैष्णवी रणशूर, सम्यक रणशूर, जयेश कोकाटे, साई कदम, मनस्वी कदम, रितेश थोरात, सत्यम पवार, सृष्टी मोरे, हर्षल विघ्ने, वेदांती रणशूर आणि स्वरांजली थोरात या विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने आणि आत्मविश्वासाने प्रश्न विचारले.

या कार्यक्रमाला संतोष चौधरी, माजी अध्यक्ष बाळू मोरे, सुभाष रणशूर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश रणशूर, अंगणवाडी सेविका वनिता चौधरी, दिपाली वाघ यांच्यासह मोठ्या संख्येने पालक व महिला उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ सूर्यवंशी आणि शिक्षिका वैशाली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# शालेय स्पर्धाच यशाची गुरुकिल्ली

## अभय आव्हाड; राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : शालेय जीवनातील स्पर्धा हीच पुढील राज्यसेवा व लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची भक्कम पायाभरणी ठरते. शालाबाह्य स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास करत आपल्या स्वप्नांना बळ द्यावे, असे प्रतिपादन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.

पाथर्डी येथील श्री विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत तब्बल ५३ विद्यार्थ्यांनी राज्य, जिल्हा व तालुका गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

याप्रसंगी मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी, जयश्री एकशिंगे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत इयत्ता पहिलीतील शिवदीप दिलीप ठोंबरे, इयत्ता दुसरीतील अवनी सोपान डांगे, तनिष्का तानाजी सानप, शिया ज्ञानेश्वर टेकाळे, शिवांश कैलास डाके, आर्या अमित हंपे, उमेर परवेज मनियार तसेच इयत्ता तिसरीतील माहिरा रईस आतार या आठ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. विद्यार्थ्यांच्या यशासाठी अनुजा कुलकर्णी, जयश्री एकशिंगे, मनिषा गायके, आशा बांदल, राधिका सरोदे, ज्योती हंपे, कीर्ती दगडखैर व विद्या घोडके यांचे मार्गदर्शन लाभले.



> शालेय स्तरावर स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थ्यांमध्ये यूपीएससी व एमपीएससी सारख्या उच्चस्तरीय परीक्षांविषयी आवड निर्माण होते. विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास करून स्वतःचे आणि पालकांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहावे. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये शिक्षक व पालकांचा मोलाचा वाटा आहे.
>
> **– अभय आव्हाड**

# कर्जतला उद्या राजमुद्रा केसरी कुस्ती स्पर्धा

## महाराष्ट्रातील नामवंत पहिलवानांची हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत येथील राजमुद्रा ग्रुपच्या वतीने सालाबादाप्रमाणे कर्जत येथे राजमुद्रा केसरी निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान उद्या, २० एप्रिल २०२६ रोजी दुपारी तीन वाजता कै. पै. दिलीपनाना, गुलाबराव तोरडमल क्रिडा संकुलाच्या मैदानावर रंगणार आहे, या स्पर्धेतील विजेत्याला लाखाचे बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे अशी माहिती संयोजक विजयकुमार तोरडमल यांनी दिली.

राजमुद्रा ग्रुपचे अध्यक्ष व जिल्हा तालीम संघाचे उपाध्यक्ष विजयकुमार तोरडमल यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व सामाजिक संघटनांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कुस्ती स्पर्धेचे उदघाटन सर्व सामाजिक संघटनेच्या शिलेदारां च्या हस्ते करण्यात येणार आहे, या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक भाऊसाहेब जंजिरे उपस्थित राहणार आहेत.



या स्पर्धेतील प्रमुख आकर्षण कर्जत केसरी २०२६ किताब असून विजेत्याला एकावनन हजार रुपये रोख रकमेसह, चांदीची गदा देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. उपविजेत्याला तेहतीस हजार रुपये रोख व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तृतीय स्पर्धेकाला बावीस हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तर चौथे बक्षीस अकरा हजार रोख व चषक देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

या स्पर्धेत संग्राम भिसे, संदीप गावडे, रोहित मोढळे, गणेश चव्हाण, प्रथमेश जाधव, विक्की इपकर, दादा खांडेकर, अभिजित परदेशी यांच्यासह एकूण ३२ मल्ल सहभागी होणार आहेत. प्रत्येक जोडीसाठी ११ हजार ते २१ हजार रुपयांपर्यंत बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

> राजमुद्रा कुस्ती स्पर्धेसाठी राज्य भरातील मल्ल हजेरी लावतात, झाडे लावा, झाडे जगवा, स्वच्छ कर्जत-सुंदर कर्जत-हरित कर्जत, हा संदेश देत या कुस्ती मैदानाची सांगता होणार असून, हा संदेश राज्यभरात जाणार आहे. तरी कुस्ती शौकिनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.
>
> **– विजयकुमार तोरडमल**

# मढीतील अमावस्येच्या गर्दीत चोरट्यांचा कहर

## दागिने व मोबाईल लंपास; कानिफनाथ गडावरील सुरक्षा ढासळली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यातील श्रीक्षेत्र मढी येथे अमावस्येनिमित्त उसळलेल्या प्रचंड गर्दीचा गैरफायदा घेत अज्ञात चोरट्यांनी भाविकांना लक्ष्य केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या प्रकारात चार महिलांच्या गळ्यातील सुमारे चार तोळे सोन्याचे दागिने तसेच काही मोबाईल फोन चोरीला गेल्याने भाविकांमध्ये भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दि. १७ एप्रिल रोजी अमावस्येनिमित्त मढी येथे हजारो नाथभक्त दर्शनासाठी दाखल झाले होते. याच गर्दीत चोरट्यांनी कौशल्याने हात साफ करत तीन ते चार वेगवेगळ्या महिलांना लक्ष्य केले.

हाजीटाकळी (ता. शिरूर, जि. पुणे) येथील गंगुबाई गोविंद मुंजाळ (वय ७०) या नातेवाईकांसह दर्शनासाठी आल्या होत्या. दर्शन आटोपून तिसगाव बसस्थानकावर एस.टी.मध्ये चढत असताना त्यांच्या गळ्यातील सुमारे ७ ग्रॅम वजनाचे डोरले पोत अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. त्याचवेळी त्यांच्या सोबत असलेल्या सुलाबाई नामदेव उचाळे यांच्या गळ्यातील सोन्याचे मणीही चोरीला गेले.

दुसऱ्या घटनेत, मगरपट्टा (हडपसर, पुणे) येथील शालिनी सुदाम दळवी (वय ७०) या सकाळच्या आरतीसाठी मंदिरात गेल्या असताना त्यांच्या गळ्यातील सुमारे दीड तोळ्याचे मिनी गंठण चोरीला गेले. आरतीनंतर बाहेर आल्यानंतर हा प्रकार त्यांच्या लक्षात आला.

तिसऱ्या घटनेत, नेवासा तालुक्यातील निशा सतीश मुथा (वय ५७) यांच्या गळ्यातील दीड तोळ्याचे मंगळसूत्रही आरतीदरम्यान अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले. या सर्व घटनांमध्ये विशेषतः आरतीच्या वेळी कानिफनाथ गडावर होणाऱ्या प्रचंड गर्दीचा चोरट्यांनी फायदा घेतल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, अनेक भाविकांचे मोबाईल फोनही चोरीला गेल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. यापुढे श्रीक्षेत्र मढी देवस्थान ट्रस्ट व पोलीस प्रशासनाने कडक बंदोबस्त करावा, तरच भविष्यात चोरीच्या घटनांना आळा बसणार आहे.

### देवस्थान ट्रस्ट व पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

चोरीच्या घटनांमुळे भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून अशा प्रकारच्या घटना दरवर्षी घडत असल्याने देवस्थान ट्रस्ट व पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गर्दी नियंत्रणासाठी अधिक कडक सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा व पोलीस बंदोबस्त वाढवण्याची मागणी भाविकांकडून होत आहे.

# बोरावके महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर येथील रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेजमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य या विषयावर विशेष ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन रयत शिक्षण संस्था मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्य मीनाताई जगधने यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

या प्रदर्शनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास, शैक्षणिक कार्य, सामाजिक परिवर्तनातील योगदान, भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीतील भूमिका तसेच त्यांच्या विचारसरणीवर आधारित विविध ग्रंथ, संदर्भ पुस्तके, चरित्रे, दुर्मिळ साहित्य, छायाचित्रे आणि नियतकालिकांचा समावेश करण्यात आला.



या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास व संशोधन करण्याची मौल्यवान संधी उपलब्ध झाली. याप्रसंगी मीनाताई जगधने यांनी सदर उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. अनुप दळवी व प्रो. डॉ. शरद शेळके यांची विशेष उपस्थिती लाभली.

त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा, प्रा. डॉ. बाबासाहेब शेंडगे यांचे व्याख्यान, सलग अभ्यास अभियान, ग्रंथ प्रदर्शन व निबंध स्पर्धे चेही आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला डॉ. अशोक माहुरे, डॉ. योगिता रांधवणे, डॉ. योगिता बागुल, डॉ. अर्जुन आनंदकर, प्रा. शंकर मुंडे, राजेंद्र शिंदे, संतोष वडणे, बाळू जाधव, मदन शिंदे तसेच विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वडिलांच्या परंपरा पुढे नेत धनराज कोते यांची दमदार झेप

## सामुदायिक विवाहातून शिर्डीत सामाजिक आदर्श

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : समाजसेवेची परंपरा जपत तरुण नगरसेवक धनराज कैलास बापू कोते हे आज शिर्डी शहरात जबाबदार आणि जनतेशी घट्ट नाळ जोडलेले नेतृत्व म्हणून उदयास येत आहेत. त्यांच्या कुटुंबाने सुरू केलेला सामुदायिक विवाह सोहळा हा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून अनेक गरजू कुटुंबांना सन्मानाने विवाह करण्याची संधी उपलब्ध करून देत आहे.

शिर्डी नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष म्हणून ओळख असलेले कैलास बापू कोते यांनी समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या अडचणी लक्षात घेऊन सामुदायिक विवाह सोहळ्याची परंपरा सुरू केली. विवाहासाठी लागणारा मोठा खर्च अनेक कुटुंबांसाठी अडथळा ठरत असताना या उपक्रमामुळे अनेक तरुण-तरुणींना सन्मानपूर्वक संसार सुरू करण्याची संधी मिळाली. त्यामुळे या उपक्रमाला समाजातून मोठा प्रतिसाद मिळत गेला.



या उपक्रमाच्या यशामागे सुमेत्रा कोते (सुमेत्रा काकी) यांचेही मोलाचे योगदान आहे. त्या प्रत्येक विवाह सोहळ्याकडे आपल्या मुला-मुलीच्या लग्नाप्रमाणे पाहतात. विवाह सोहळ्याचे नियोजन, पाहुण्यांची व्यवस्था, नवदाम्पत्यांची काळजी यांसारख्या प्रत्येक बाबीकडे त्या आत्मीयतेने लक्ष देतात. त्यांच्या मेहनतीमुळे या कार्यक्रमाला कौटुंबिक वातावरण लाभते आणि सहभागी कुटुंबांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होते.

गेल्या नऊ वर्षांपासून धनराज कोते हे या सामुदायिक विवाह सोहळ्यात सक्रिय सहभाग घेत आहेत. नियोजन, व्यवस्थापन आणि कार्यक्रमाची सुयोग्य अंमलबजावणी यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रत्येक छोट्या तपशीलाकडे लक्ष देत त्यांनी या उपक्रमाला अधिक संघटित स्वरूप दिले आहे. त्यांच्या पुढाकारामुळे सामुदायिक विवाह सोहळा अधिक मोठ्या प्रमाणावर आणि अधिक प्रभावीपणे राबवला जात आहे.

तरुण नगरसेवक म्हणून धनराज कोते यांची कार्यपद्धती शिर्डीकरांच्या लक्षात येत आहे. परंपरा आणि आधुनिक विचारांचा समतोल साधत ते समाजाच्या प्रगतीसाठी कार्यरत आहेत. सामाजिक उपक्रम, नागरिकांच्या समस्या आणि विकासाच्या प्रश्नांवर त्यांची सक्रिय भूमिका दिसून येते.

सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून कोते कुटुंबाने समाजात एक आदर्श निर्माण केला असून या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे. समाजातील गरजू कुटुंबांना आधार देत आणि सामाजिक बांधिलकी जपत धनराज कोते हे वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत समाजसेवेच्या क्षेत्रात दमदार झेप घेत असल्याचे चित्र शिर्डीत पाहायला मिळत आहे.

# अस्तगावमध्ये भीम गीतांची प्रेरणादायी मैफल

## अजय देहाडे यांच्या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**एकरूखे** : राहाता तालुक्यातील अस्तगाव येथे अजय देहाडे यांच्या प्रेरणादायी भीम गीतांच्या कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रदीप (पप्पू भाऊ) बनसोडे उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी, "डॉ. बाबासाहेबांचे विचार वर्षातील ३६४ दिवस डोक्यात घ्या आणि एक दिवस बाबासाहेबांना डोक्यावर घ्या," असे सांगत सामाजिक परिवर्तनासाठी बाबासाहेबांच्या विचारांची गरज अधोरेखित केली.

यावेळी अस्तगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा प्रशासक पवन आरंगळे पाटील, माजी सभापती श्रीनिवास त्रिभुवन, पोलीस पाटील राजेश त्रिभुवन यांच्यासह दिलीप त्रिभुवन, शरद त्रिभुवन, सुंदर त्रिभुवन, राजेंद्र त्रिभुवन, विजय त्रिभुवन, सतीश आत्रे, सागर गोरडे, विजय मोकळ, प्रशांत गोरडे आणि संभाजी मेढे यांच्या हस्ते अजय देहाडे यांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमास जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गौरव त्रिभुवन, सामाजिक कार्यकर्ते अनिल त्रिभुवन तसेच प्रमोद त्रिभुवन, आकाश त्रिभुवन, देवांश त्रिभुवन, गौतम त्रिभुवन, महेश त्रिभुवन, विरेश त्रिभुवन आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकिय आधार केंद्रे सुरू करा

## भाजपा महिला आघाडीची तहसिलदारांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरूर** : ब व तालुक्यातील अधिकृत शासकीय आधार केंद्रे बंद असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत असून या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी प्रिया बिरादार यांनी तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांना निवेदन देत केली आहे.

नागरिकांकडून मिळणाऱ्या तक्रारीनुसार, नवीन आधार नोंदणी तसेच आधार अद्ययावत करण्यासाठी शालेय विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अधिकृत केंद्रे बंद असल्यामुळे नागरिकांना खाजगी सीएससी केंद्रांकडे वळावे लागत असून, या ठिकाणी अवाजवी शुल्क आकारले जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या संदर्भात बिरादार यांनी तहसील प्रशासनाकडे निवेदन देत शहर व तालुक्यातील सर्व अधिकृत आधार केंद्रांची अद्ययावत माहिती जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच या केंद्रांची तपासणी करण्यात आली आहे का, संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, याची माहिती सार्वजनिक करावी, अशीही मागणी करण्यात आली.



दरम्यान, सर्व सीएससी केंद्रांवर शासनाने निश्चित केलेल्या सेवा शुल्काचे फलक स्पष्टपणे दर्शनी भागात लावण्याच्या सूचना देण्याची मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांसह भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

# ओला, दुर्गंधीयुक्त गहू थेट गोदामात

## नेवाशातील पुरवठा विभाग संशयाच्या भोवऱ्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा येथील शासकीय धान्य गोदामात ओला व दुर्गंधीयुक्त गहू उतरवून साठवण्यात आल्याने पुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. खाण्यायोग्य नसलेल्या धान्याचा पंचनामा करून तो नष्ट करण्याऐवजी थेट गोदामात साठवण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणाबाबत संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही संबंधित अधिकारी उपलब्ध न झाल्याने संशय अधिकच गडद झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शासकीय वितरणासाठी आणण्यात आलेल्या गव्हाच्या साठ्यात मोठ्या प्रमाणात ओलसरपणा आणि दुर्गंधी आढळून आली. पावसाचे कोणतेही कारण नसताना गहू भिजलेला आढळल्याने वजन वाढवण्यासाठी जाणूनबुजून पाणी टाकल्याचा आरोप पुढे आला आहे. या कथित 'पाणी रॅकेट'मध्ये वाहतूक कंत्राटदार गाढे यांची भूमिका संशयास्पद असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. इतके गंभीर आरोप असूनही संबंधित कंत्राटदारावर अद्याप फौजदारी कारवाई न झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

नियमानुसार, निकृष्ट किंवा अयोग्य धान्य आढळल्यास ते तत्काळ मोहोरबंद करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे आवश्यक असते. मानवी वापरासाठी अयोग्य असल्यास ते नष्ट करण्याची तरतूद आहे. मात्र, नेवाशात हा नियम धाब्यावर बसवून सदर गहू थेट गोदामात उतरवून साठवण्यात आला. त्यामुळे पुराव्यांशी छेडछाड करण्याचा प्रयत्न तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणात पुरवठा निरीक्षक तसेच कोठार प्रमुख यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांनी भ्रमणध्वनी स्वीकारले नाहीत. त्यामुळे अधिकाऱ्यांवर दबाव आहे का, की भ्रष्टाचारात त्यांचाही सहभाग आहे, याबाबत चर्चांना उधाण आले आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घ्यावी!**

अत्यावश्यक वस्तू कायद्यांतर्गत निकृष्ट धान्याची साठवणूक करणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. स्थानिक प्रशासनाची भूमिका संशयास्पद वाटत असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी होत आहे. गोदामातील नोंदी, सीसीटीव्ही चित्रीकरण, वाहतुकीचा मार्ग आणि संबंधित कंत्राटदाराची माहिती तपासल्यास या कथित 'पाणी घोटाळ्या'चे सत्य समोर येऊ शकते. दोषी आढळल्यास कंत्राटदार गाढे यांचे परवाने रद्द करून सखोल चौकशी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा विविध संघटनांनी दिला आहे.

**अधिकारी कोणाला घाबरतात?**

या प्रकरणावर अधिकृत भूमिका जाणून घेण्यासाठी पुरवठा विभागातील अधिकारी उपलब्ध झाले नाहीत. वारंवार संपर्क साधूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. कंत्राटदाराच्या दबावामुळे अधिकारी 'संपर्क क्षेत्राबाहेर' झाले आहेत की या प्रकरणात त्यांचाही सहभाग आहे, याचे उत्तर प्रशासनाला द्यावे लागणार आहे.

# शिवडोह धरणावरून शेतीसाठी बसविलेले पंप चोरीला

## वडझिरे-देवीभोयरे शेतकऱ्यांचे लाखांचे नुकसान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : प्रतिनिधी घाटाखालील वडझिरे व देवीभोयरे परिसरातील शिवडोह धरणावरून शेतीसाठी बसविण्यात आलेले विद्युत पंप, वायर व अन्य साहित्य अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी पारनेर पोलिसांकडे केली आहे.

कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर कांदा, भुईमूग, मका आदी पिकांना पाणी देण्यासाठी शेतकरी दिवस-रात्र राबत आहेत. मात्र शिवडोह तलावावर बसविण्यात आलेले विद्युत पंप व पाइप चोरीला गेल्याने पाणी असूनही पिके वाळण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. या चोरीत शुभम निघुट, अर्जुन गंधाक्ते, सुनील दिघे, किसन मोरे, बबन लंके, दत्तात्रय चौधरी, विशाल दिघे, चंद्रकांत चौधरी, बाळू चौधरी आणि सुभाष सुरुडे यांचे पंप, पाइप व विद्युत साहित्य चोरीला गेले आहे.

दरम्यान, फेब्रुवारी महिन्यातही याच परिसरात अशाच प्रकारची चोरी झाली होती. वारंवार होणाऱ्या चोरीमुळे शेतकरी हवालदिल झाले असून पोलिसांनी या चोरट्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तक्रार निवेदनाद्वारे केली आहे.

# आश्वी बुद्रुकमध्ये बिबट्याचा हल्ला

## महिला जखमी, मादी बिबट पिल्लासह जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : आश्वी बुद्रुक परिसरात बिबट्याच्या दहशतीने शुक्रवारी उग्र रूप धारण करत शेतात काम करणाऱ्या महिलेवर हल्ला केला. या घटनेनंतर वनविभागाने युद्धपातळीवर शोधमोहीम राबवून शनिवारी सायंकाळी मादी बिबट्याला पिल्लासह जेरबंद केले.



मिळालेल्या माहितीनुसार, सुमनबाई बाळासाहेब खेमनर या आपल्या शेतात काम करत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झडप घातली. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या. आरडाओरडा ऐकून ग्रामस्थ धावून आल्याने बिबट्याने पळ काढला. जखमी सुमनबाईंना तत्काळ प्रवरा ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी रुग्णालयात भेट देत उपचारांची माहिती घेतली. दरम्यान, राज्याचे जलसंपदा व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वनविभागाला बिबट्याला तातडीने जेरबंद करण्याचे आदेश दिले.

वनपरिक्षेत्र अधिकारी सागर केदार व रमेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ७० ते ८० जणांचे पथक तैनात करण्यात आले. शनिवारी केरुजी बाचकर यांच्या शेतातील गिनी गवतामध्ये बिबट्या असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर परिसराला वेढा घालण्यात आला. नियोजनबद्ध मोहिमेनंतर मादी बिबट्याला तिच्या पिल्लासह जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले.

दरम्यान, बिबट्याच्या हल्ल्यानंतर आवश्यक असणारे 'रेबीज इम्युनोग्लोब्युलिन' इंजेक्शन केवळ जिल्हा रुग्णालय येथेच उपलब्ध असल्याने उपचारात विलंब होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. हे इंजेक्शन घुलेवाडी ग्रामीण रुग्णालय येथे उपलब्ध करावे, अशी मागणी होत आहे.

आमदार अमोल खताळ यांनी आवश्यक औषधे स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, परिसरात आणखी बिबट्या असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने वनविभागाने दोन पिंजरे लावले असून रात्री थर्मल ड्रोनद्वारे गस्त वाढवण्यात आली आहे, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी सागर केदार यांनी दिली.

# अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर बालविवाह रोखण्याचे आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : प्रतिनिधी अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात बालविवाह रोखण्यासाठी प्रशासनाने सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे. बालविवाह होत असल्याचे आढळल्यास संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार मिलिंदकुमार वाघ आणि बालविकास प्रकल्पाधिकारी शोभा शिंदे यांनी दिला आहे.

बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार बालविवाह हा अजामीनपात्र गुन्हा असून दोषींना दोन वर्षांपर्यंत सक्तमजुरी व एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. दि. १९ एप्रिल रोजी अक्षयतृतीयेच्या दिवशी मोठ्या प्रमाणात विवाह होत असल्याने बालविवाहाची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तालुक्यात कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास पोलीस, महिला व बालविकास विभाग किंवा चाइल्ड हेल्पलाईन १०९८ वर तक्रार करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# माणुसकीशिवाय शिक्षणाला अर्थ नाही : डॉ. रफिक सय्यद

## निघोज येथे प्राचार्य अवघडे, गुंजाळ व तांबे यांचा सेवापूर्ती सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : "माणसात माणुसकी नसेल, तर त्या जगण्याला अर्थ नाही," असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते डॉ. रफिक सय्यद यांनी केले. नगर जिल्हा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निघोज येथील श्री मुलिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य अंकुशराव अवघडे, ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव गुंजाळ व ज्येष्ठ शिक्षिका तुळसाबाई तांबे यांच्या सेवापूर्ती समारंभात ते बोलत होते. प्रसिद्ध कीर्तनकार दत्तात्रय महाराज झेंडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. सय्यद यांनी शिक्षणासोबत मानवतेचे मूल्य जोपासण्याची गरज अधोरेखित केली.

अध्यक्षीय भाषणात झेंडे महाराज यांनी सेवानिवृत्त शिक्षकांनी उर्वरित आयुष्य समाजसेवेला वाहावे, असे सांगितले. सचिन वराळ पाटील यांनी प्राचार्य अवघडे यांच्या शिस्तप्रिय कार्यपद्धतीचे कौतुक केले. कार्यक्रमास तुकाराम कातोरे, नवनाथराव खोसे, धनंजय खोसे यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य अवघडे व गुंजाळ यांनी प्रत्येकी ३९ वर्षे, तर तुळसाबाई तांबे यांनी ३० वर्षे शैक्षणिक सेवा बजावत सेवानिवृत्ती स्वीकारली.




# नंदकुमार कुरुमकर राज्य शिक्षकेतर महासंघाचे प्रसिद्धी प्रमुख

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा**: तालुक्यातील नंदकुमार कुरुमकर यांची राज्य शिक्षकेतर महासंघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. महासंघाचे अध्यक्ष वाल्मीक सुरासे यांनी ही घोषणा केली.

गेल्या ३८ वर्षांपासून कुरुमकर महासंघात सक्रिय असून १९९२ पासून त्यांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला आहे. वरिष्ठ वेतनश्रेणी, आश्वासित प्रगती योजना, भरती प्रक्रिया तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत त्यांनी प्रसिद्धीच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले.

३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत असलेल्या कुरुमकर यांच्या अनुभवाचा राज्यभरातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ होईल, असा विश्वास सुरासे यांनी व्यक्त केला. त्यांच्या निवडीबद्दल राज्यभरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




# चौकारच... पण पंजाबचा विजयाचा आणि मुंबईचा पराजयाचा

**अंपायर्स कॉल**

**– गिरीश कुलकर्णी**

गुरुवारी रात्री मुंबईच्या वानखडे मैदानावर पंजाब किंग्ज व मुंबई इंडियन्स यांच्यात झालेल्या सामन्यात पंजाबने मुंबईचा सात गडी राखून दारूण पराभव केला व गुणतालिकेत ९ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. पाच सामन्यांपैकी चार सामने जिंकत पंजाब या स्पर्धेत अद्याप अपराजित आहे. केकेआर विरुद्धचा सामना पावसामुळे रद्द करण्यात आल्याने दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला. मुंबचा हा सलग चौथा पराभव असून पंजाबचा हा चौथा विजय आहे. सलग पराभवामुळे मुंबईची नवव्या स्थानावर घसरण झाली आहे. पहिला सामना जिंकण्याचा इतिहास मुंबईने रचला असला तरी नंतरच्या चारही सामन्यात त्यांना प्रतिस्पर्धी संघांनी अस्मान दाखवले. मुंबईच्या संघात सध्या बेनाव दिसून येत आहे. कर्णधार हार्दिक पांड्याच्या मनमानी निर्णयावर खेळाडू नाराज असल्याचे कालच्या सामन्यातून स्पष्ट दिसले. मुंबईच्या संघात ऑल इज वेल नसल्याने ते पराभवाचे एक कारण असले तरी जगातील पहिल्या क्रमांकाचा गोलंदाज जसप्रित बुमराचे गोलंदाजीतील अपयश हेसुद्धा एक कारण आहे. पाच सामन्यातून त्याला अद्याप एकही गडी बाद करता आलेला नाही. तो गोलंदाजीत प्रभावी ठरत नसल्याने दबावाखाली इतर गोलंदाजांनाही सूर सापडेनासा झाला आहे. सूर्यकुमार यादवचे फलंदाजीतील अपयशही मुंबईच्या पराभवाला कारणीभूत ठरत आहे. क्षेत्ररक्षणातही ढिसाळपणा आला असून कालच्या सामन्यात मुंबईने दोन-तीन सोपे झेल सोडले. पंजाबच्या प्रभसिमरनला ११ धावांवर दिलेल्या जीवदानाने मुंबईला पराभवाच्या खाईत लोटले. जीवदानाचा फायदा उठवत शेवटपर्यंत नाबाद राहत त्याने ८० धावांची विजयी खेळी केली. पंजाबच्या विजयात मुंबईच्य खेळाडूंनी हातभार लावला असला तरी पंजाबचा कर्णधार शैलश अय्यरने सलग दिसरे अर्धशतक करत विजय हातातून निसटणार नाही याची काळजी घेतली. क्षेत्ररक्षण करताना त्यांने मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्याचा अविश्वसनीय झेल घेतला. मागच्या हंगामात ट्रॉफी उंचावण्याचे त्यांचे स्वप्न अवघ्या सहा धावांनी भंग पावले होते. मात्र यावेळी ट्रॉफी उंचवायचीच या पक्क्या इराद्याने ते प्रत्येक सामनान्यात मैदानात उतरत आहेत. पाचही सामन्यात त्यांची फलंदाजी बहरली आहे, तर गोलंदाजांनी आपली कामगिरी चोख बजावली आहे.





पंजाबने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली. रोहित शर्मा तंदुरस्त नसल्याने क्विंटन डिकॉकला संघात संधी मिळाली. त्याने व रायन रिकल्टन यांनी डावाची सुरूवात केली. रिकल्टन (२) व सूर्यकुमार यादव (०) झटपट बाद झाले. रमन धीरला फलंदाजीत बढती देण्यात आली. त्याने व डिकॉकने तिसऱ्या गड्यासाठी ६८ चेंडूत १२२ धावांची बहुमुल्य भागिदारी केली. धीर ५० धावांवर बाद झाला. डिकॉकने तुफान फटकेबाजी करत शतकी पल्ला गाठला. त्याने नाबाद राहत ११२ धावा केल्या. त्यात त्याने आठ चौकार आणि सात षटकार खेचले. १२ षटकानंतर मुंबईच्या १२५ धावा झाल्या होत्या. मुंबई दोनशेच्या पुढचा टप्पा पार करेल असे वाटत होते. मात्र शेवटच्या आठ षटकात पंजाबच्या गोलंदाजांनी उत्तम गोलंदाजी केल्याने मुंबईला दोनशे धावांचा टप्पा पार करता आला नाही. निर्धारित २० षटकात त्यांनी ६ गडी गमावून १९५ धावा केल्या. पंजाबकडून अर्शदिप सिंग सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने तीन गडी बाद केले, तर यानसन आणि शशांक सिंगने एक गडी बाद केला.

विजयी १९६ धावांचा पाठलाग करताना पंजाबचे सलामीवीर प्रभसिमरन सिंग व प्रियांश आर्य यांनी धमाकेदार सुरूवात केली. या दोघांनी दीपक चहरच्या पहिल्या षटकात २१ धावा वसूल केल्या. मात्र फिरकीपटू अल्लाह गझनफरने प्रियांश आर्य व कूपर कॉनली यांना बाद केल्याने मुंबईने सामन्यात पुनरागमन केले होते. कर्णधार शैलेश अय्यर व प्रभसिमरने कोणतेही दडपण न घेता फलंदाजी केली. जम बसवल्यावर दोघांनी बुमरासह सर्वच गोलंदाजांची धुलाई केली. दरम्यान दोघांनीही अर्धशतक पूर्ण केले. अय्यरचे हे सलग तिसरे अर्धशतक होते. विजय समीप आला असताना तो ६६ धावांवर बाद झाला. प्रभसिमरन (८०) व मार्कस स्टॉयनिस (१०) या दोघांनी नाबाद राहत विजयावर शिक्कामोर्तब केले. बुमराला याही सामन्यात एकही गडी बाद करता आला नाही. त्याच्या चार षटकात ४१ धावा कुटल्या गेल्या.

दैनिक

जनता आवाज

अहिल्यानगर रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ पान नं. ८

# ‘त्या’ संस्कृतीवर शामीर सय्यद यांची टीका

## गरजू युवकाला उपचारासाठी दोन लाखांची मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : संकटसमयी सर्वसामान्य नागरिक लोकप्रतिनिधींकडे धाव घेतात; मात्र थेट मदत करण्याऐवजी ‘या पीएला भेटा’, ‘त्या अधिकाऱ्याला भेटा’ अशी उत्तरे देत प्रश्नांची टाळाटाळ केली जाते, अशी खोचक टीका माजी नगरसेवक शामीर सय्यद यांनी केली. आकाश बाफना यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.



शुक्रवार (दि. १७ एप्रिल २०२६) रोजी सायंकाळी ७ वाजता मुस्लिम समाज व शामीर सय्यद मित्र परिवाराच्या वतीने शिवसेना युवा नेते आकाश बाफना यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना सय्यद म्हणाले की, अनेक लोकप्रतिनिधी स्वतः निर्णय घेण्याऐवजी केवळ फोन करून ‘योजनेत बसवा’ असे सांगतात. प्रत्यक्षात शासनाच्या योजना सर्वांसाठी आहेत; मात्र नागरिकांना वारंवार चकरा मारायला लावणे चुकीचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, आकाश बाफना यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन जामखेड येथील मुस्लिम समाजातील एका गरजू युवकाला आरोग्य उपचारासाठी दोन लाख रुपयांची मदत मिळवून दिली. त्यांच्या विशेष प्रयत्नांमुळे ही मदत तात्काळ मिळाल्याचे सय्यद यांनी सांगितले. या मदतीबद्दल मुस्लिम बांधवांनी बाफना यांचे आभार मानले. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक हाजी डॉ. फारूक शेख, माजी नगरसेवक शामीर सय्यद, रौफ सय्यद, दत्तात्रेय चऱ्हाटे, जावेद शेख, अली तांबोळी, शौकत सय्यद, करीम सय्यद, अजित बागवान, राजू सय्यद, अजहर शेख, आदिल सय्यद, अरिफ सय्यद, शहबाज सय्यद, इराणी इंतकाब, पप्पू शेख, मोसिन पठाण, हरून सय्यद, आय्यास खान, इरफान पठाण, यासीर सय्यद, अरबाज शेख, आफताब मुन्ना सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी बोलताना आकाश बाफना म्हणाले की, शिवसेना हा पक्ष जात, धर्म, पंथ यांच्या पलीकडे जाऊन काम करणारा आहे. सामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही सदैव तत्पर असतो. ‘‘८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण’’ हा शिवसेनेचा मूलमंत्र असून गरजूंपर्यंत मदत पोहोचवणे, माणुसकी जपणे आणि कोणत्याही भेदभावाशिवाय सेवा करणे हेच आमचे ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# एमएस-सीआयटीच्या नावाखाली विद्यार्थ्यांची दिशाभूल?

## कर्जतमधील संगणक केंद्रांविरोधात तक्रार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : शहरात एमएस-सीआयटी संगणक कोर्सच्या नावाखाली विद्यार्थ्यांची दिशाभूल होत असल्याचा गंभीर आरोप पुढे आला असून, या संदर्भात एमकेसीएलच्या अधिकृत केंद्रांनी पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, शहरातील काही संगणक प्रशिक्षण केंद्रे आवश्यक अधिकृत मान्यता नसतानाही एमएस-सीआयटी कोर्स शिकवण्याचे व शासनमान्य प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांना देत आहेत. प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना इतर अभ्यासक्रम शिकवून वेगळ्या स्वरूपाचे प्रमाणपत्र दिले जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रमाणपत्रांच्या वैधतेबाबत शंका निर्माण होत असून काही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची बाबही तक्रारीत अधोरेखित करण्यात आली आहे.

दरम्यान, एका विद्यार्थिनीने कर्जत पोलीस ठाण्यात लेखी निवेदन देत शहरातील एका नामांकित संगणक प्रशिक्षण संस्थेविरोधात तक्रार केली आहे. प्रवेश घेताना कोर्स शासनमान्य असल्याचे सांगण्यात आले, मात्र नंतर मिळालेल्या प्रमाणपत्राबाबत शंका निर्माण झाल्याचा दावा तिने केला आहे. फी परताव्याबाबत समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. तसेच संबंधित केंद्र चालकाने आमच्या विरोधात गुन्हा दाखल करा, असे सांगितल्याचाही आरोप तक्रार अर्जात करण्यात आला आहे. दरम्यान, टॉपर्स, ड्रीम्स व समशेर कॉम्प्युटर या अधिकृत केंद्रांनी संयुक्त निवेदनाद्वारे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून नियमांचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही संगणक कोर्ससाठी प्रवेश घेताना संबंधित संस्थेची अधिकृत मान्यता, एमकेसीएल नोंदणी व प्रमाणपत्राची वैधता पडताळून पाहावी, असे आवाहन अधिकृत केंद्रांकडून करण्यात आले आहे.

# अहिल्यानगरात बनावट सुगंधीत तंबाखूचा कारखाना उद्ध्वस्त

## १३.९२ लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघांना अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर**: शहरातील एमआयडीसी हद्दीतील गजराजनगर येथे सुरू असलेला बनावट सुगंधीत तंबाखू तयार करण्याचा कारखाना स्थानिक गुन्हे शाखेने उध्वस्त करत तिघांना अटक केली. या कारवाईत १३ लाख ९२ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे पथकाने अन्न व औषध प्रशासन विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी राजेश



बडे यांच्या उपस्थितीत गजराजनगर येथील कालीमाता मंदिराजवळील घरावर छापा टाकला. या ठिकाणी असिफ खुदाबक्ष तांबोळी (५०, मुकुंदनगर), जफर चाँद शेख (३८, मुकुंदनगर) आणि दाऊद बाबुमियाँ शेख (४२, भिंगार) हे तिघे साध्या तंबाखूत रसायने व रंग मिसळून सुगंधीत तंबाखू व पानामध्ये वापरला जाणारा बनावट किवाम तयार करताना आढळले.

कारवाईदरम्यान ६०० किलो सुगंधीत तंबाखू, तीन मिक्सर मशीन, तीन पॅकिंग मशीन, रसायने, बनावट स्टिकर, पिशव्यांचे रोल, एअर कंप्रेसर, इलेक्ट्रिक मोटारी, वजनकाटा तसेच टाटा सफारी (एमएच १७ व्ही ७००) यांसह एकूण १३.९२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# माणिकदौंडी येथे भरधाव कंटेनरची कमानीला धडक

## तीन घरांचे नुकसान, जीवितहानी टळली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी तालुक्यातील माणिकदौंडी येथे शनिवारी दुपारी भरधाव कंटेनरने स्वागत कमानीला जोरदार धडक दिल्याने कमान कोसळून शेजारील तीन घरांचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने या अपघातात जीवितहानी टळली.

पाथर्डीहून बारामतीकडे जाणाऱ्या कंटेनरवरील चालकाचा ताबा सुटल्याने वाहनाने डॉ. बाबासाहेब



आंबेडकर नगर येथील स्वागत कमानीला धडक दिली. धडकेनंतर कंटेनर अनियंत्रित होऊन शेजारील घरांवर आदळला. या घटनेत काही घरांच्या भिंतींना तडे जाऊन पडझड झाली.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, चालक मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असल्याची चर्चा परिसरात होती. अपघातानंतर संतप्त नागरिकांनी चालकाला मारहाण केल्याची माहिती मिळाली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. कंटेनर हटविल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

या अपघातामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नुकसानग्रस्त नागरिकांना मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अहिल्यानगरात बालविवाहांवर प्रशासनाची कडक नजर

## वर्षभरात १५५ प्रकरणांत हस्तक्षेप, ७ गुन्हे दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : बालविवाहासारख्या सामाजिक कुप्रथेला आळा घालण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने गेल्या वर्षभरात प्रभावी मोहीम राबवित १५५ प्रकरणांमध्ये हस्तक्षेप केला असून त्यापैकी ७ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत महिला व बालविकास विभाग, पोलीस प्रशासन आणि स्थानिक बालसंरक्षण समित्यांच्या समन्वयातून ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी दिली.



कायद्यानुसार मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि मुलाचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असल्यास तो विवाह दंडनीय ठरतो. अशा बालविवाहांना प्रतिबंध करण्यासाठी प्रशासनाकडून विविध स्तरांवर उपाययोजना करण्यात येत असून काही प्रकरणांत विवाह थांबवून पालकांकडून लेखी हमीपत्र घेण्यात आले आहे. तसेच गरज भासल्यास अल्पवयीन मुलींना बालगृहांमध्ये संरक्षण देण्याची कार्यवाहीही करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये ही कारवाई व्यापक स्वरूपात राबविण्यात आली. अहिल्यानगर व पाथर्डी येथे प्रत्येकी १९, श्रीगोंदा १७, शेवगाव १५, कर्जत १४, राहुरी १२, नेवासा ११, संगमनेर, पारनेर व राहाता येथे प्रत्येकी ९, कोपरगाव ७, जामखेड व अकोले येथे प्रत्येकी ६, तर श्रीरामपूर येथे २ प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत.

बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार बालविवाह लावणे हा गंभीर गुन्हा असून केवळ पालकांवरच नव्हे तर विवाह सोहळा आयोजित करणारे, मध्यस्थ, नातेवाईक, मंडप-डेकोरेशन व्यावसायिक, बॅण्डपथक तसेच संबंधित सेवा पुरवठादारांवरही कारवाई केली जाते, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

बालविवाहामुळे मुलींच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि भविष्यातील संधींवर गंभीर परिणाम होतात. त्यामुळे हा केवळ सामाजिक प्रश्न नसून मुलींच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित मुद्दा आहे. या पार्श्वभूमीवर गावपातळीवर जनजागृती, शाळांमधील मार्गदर्शन आणि संशयास्पद घटनांवर तात्काळ प्रतिसाद देण्याची यंत्रणा अधिक बळकट करण्यात आली आहे. ग्राम बालसंरक्षण समित्यांमध्ये अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, पोलीस पाटील, शिक्षक आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांवर विशेष जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

दरम्यान, १९ एप्रिल रोजी येणारी अक्षयतृतीया आणि लग्नसराईच्या हंगामाच्या पार्श्वभूमीवर बालविवाहाचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. बालविवाहाबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा ११२ या क्रमांकावर कळवावी, असे आवाहन करण्यात आले असून माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# खड्ड्यात बैलगाडी उलटली

## तरुण शेतकऱ्याचा मृत्यू, जामखेड तालुका हादरला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : तालुक्यातील बांधखडक परिसरात बैलगाडी उलटून झालेल्या भीषण अपघातात एका तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याने संपूर्ण तालुका हादरला आहे. गणेश मधुकर चव्हाण (वय २८) यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला असून चव्हाण वस्ती येथे शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास गणेश चव्हाण हे आपल्या चुलते बाळू गोरख चव्हाण यांच्यासोबत शेतातून जनावरांसाठी चारा घेऊन बैलगाडीतून परत येत होते. खैरी नदीजवळील रस्त्यावर असलेल्या मोठ्या खड्ड्यात बैलगाडी जोरात आदळल्याने गाडीचा तोल जाऊन ती उलटली. या अपघातात गणेश चव्हाण बैलगाडीखाली दबले गेले. डोक्याला गंभीर मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले, तर बाळू चव्हाण हेही जखमी झाले.

ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेत गणेश चव्हाण यांना मोटारसायकलवरून खर्डा येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी बार्शी येथे हलविण्यात येत असताना रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची नोंद खर्डा पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली आहे.

**कुटुंबावर दुःखाचा डोंगर**

गणेश चव्हाण हे कुटुंबाचा आधारस्तंभ होते. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या या तरुणाच्या अकाली निधनाने घरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात वडील व दोन भाऊ असा परिवार आहे. गावात शोककळा पसरली असून संध्याकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. शेतात काम करताना झालेल्या या अपघाती मृत्यूमुळे कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. त्यामुळे शासनाने स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना अंतर्गत तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी नातेवाईकांकडून करण्यात आली आहे.

# बँकेत विसरलेल्या सोन्याच्या बांगड्या प्रामाणिकपणे परत

## खडकवाडी शाखेत आदर्श उदाहरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : खडकवाडी येथील अहमदनगर जिल्हा सहकारी बँक शाखेत प्रामाणिकपणाचे प्रेरणादायी उदाहरण समोर आले आहे. शाखा अधिकारी बाबासाहेब गागरे यांनी लॉकरमध्ये विसरलेल्या सुमारे दोन तोळ्यांच्या सोन्याच्या बांगड्या शोधून त्या संबंधित खातेदार कुटुंबाला सुरक्षितपणे परत केल्या.



मिळालेल्या माहितीनुसार, बाबासाहेब खोसे व रोहिणी खोसे यांनी यात्रेनिमित्त लॉकरमधून सोन्याच्या वस्तू काढल्या होत्या. मात्र गडबडीत दोन सोन्याच्या बांगड्या लॉकरमध्येच राहून गेल्या. ही बाब शाखा अधिकारी बाबासाहेब गागरे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तात्काळ सीसीटीव्हीच्या मदतीने तपास सुरू केला. संबंधित खातेदाराचा शोध घेत त्यांनी त्या बांगड्या सुरक्षितपणे परत केल्या.

बांगड्या परत मिळाल्यानंतर खोसे कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करत गागरे यांच्या प्रामाणिकपणाचे मनापासून कौतुक केले. यावेळी प्रसाद कर्नावट, प्रवीण तांबे, रोखपाल अर्चना झावरे, मच्छिंद्र खामकर आदी उपस्थित होते.

### प्रामाणिकतेचा आदर्श

आजच्या काळात प्रामाणिकपणाची उदाहरणे दुर्मिळ होत असताना बाबासाहेब गागरे यांनी आपल्या कर्तव्यदक्षतेतून प्रामाणिकतेचा आदर्श घालून दिला आहे. नैतिकता, जबाबदारी आणि प्रामाणिकपणा जपणाऱ्या व्यक्तींची समाजाला गरज असल्याचे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे. त्यांच्या या कार्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# कोल्हारमध्ये शिवधन पतसंस्थेचा पाचवा वर्धापन दिन

## महिला बचत गटांना अर्थसहाय्यामुळे ग्रामीण उद्योगांना चालना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : ग्रामीण भागातील लघुउद्योग, महिला बचत गट आणि लहान व्यावसायिकांना आर्थिक बळ देत स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या शिवधन ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. चा पाचवा वर्धापन दिन कोल्हार येथे उत्साहात साजरा करण्यात आला. झुंबरशेठ कुंकुलोळ कॉम्प्लेक्स येथे झालेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष अजित मोरे होते. यावेळी उपाध्यक्ष गोविंद राजभोज, डॉ. सुनिल खर्डे, प्रशांत कुलकर्णी, सुरेश कुंकुलोळ, नानासाहेब कडसकर, महेश रक्ताटे, प्रदीप आहेर, आनंद रांका, अतुल रांका, निलेश शिंगवी, ज्ञानदेव निबे, कैलास लोंढे, केतन लोळगे, किरण खर्डे, संदीप करकुटे, ॲड. भरत घुले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच समता पतसंस्था कोल्हार शाखा चे शाखा व्यवस्थापक कानडे, आयडीबीआय बँक चे व्यवस्थापक रोकडे, भावेश पाटील, किशोर राजभोज, पत्रकार गणेश सोमवंशी, दीपक डंक, दत्तात्रय घुले, व्यवस्थापक विजय निबे, अजय मांजरे, शिवधन अर्बन निधी चे व्यवस्थापक समीर शेख, दत्तात्रय कडू, प्रांजली गाढे, आदिल सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व नारळ वाढवून करण्यात आली.

शिवधन पतसंस्थेने आधुनिक बँकिंग तंत्रज्ञानाचा अवलंब करत ग्राहकांसाठी एनईएफटी, आरटीजीएस, क्यूआर कोड, डिजिटल बँकिंग ॲप्स अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच सोनेतारण कर्ज, व्यापाऱ्यांसाठी गोल्ड लोन सीसी, वाहन कर्ज, तारण कर्ज यांसह विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. मासिक बचत योजनेच्या माध्यमातून ठेवीदारांना आकर्षक व्याजदर देण्यात येत असून सामाजिक उपक्रमांमध्येही पतसंस्था सक्रिय सहभाग नोंदवत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देत विश्वासार्ह आर्थिक संस्था म्हणून शिवधन पतसंस्था पुढे येत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी बोलताना संस्थापक अध्यक्ष अजित मोरे यांनी ग्रामीण भागातील महिला बचत गटांसाठी दिल्या जाणाऱ्या कर्ज योजनांमुळे लघुउद्योग व व्यवसायांना गती मिळत असल्याचे सांगितले. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी पतसंस्था प्रभावी माध्यम ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक ‘जनता आवाज’, मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.